सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ९१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

नवी दिल्ली : अयोध्या श्रीराम मंदिर देणगी चोरी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग द्वारे चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणार्या याचिकेवरील सुनावणी-वेळी सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. १३ जुलै) केंद्र सरकार, उत्तर प्रदेश सरकार आणि राम मंदिर ट्रस्टला नोटिसा बजावल्या आ-हेत. तसेच राम मंदिरातील अर्पण चोरीच्या प्रकरणाच्या तपासाबाबत सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेशउत्तर प्रदेशच्या एसआयटीला दिले. 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'लाही नोटीस बजावण्यात आली. आता सर्वोच्च न्यायालय या प्रकरणावर २० जुलै रोजी सुनावणी करणार आहे.अयोध्या श्रीराम मंदिर देणगी चोरी प्रकरणी दाखल याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाला आतापर्यंत झालेल्या तपासाचा प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

## पालकांचे एसआयआर अनिवार्य

नवी दिल्ली :निवडणूक आयोगाने मतदार यादीत नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नवीन मतदारांना फॉर्म ६ सोबत आपल्या पालकांचे 'एसआयआर' तपशील जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मतदार नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ करण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे.अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, या नव्या नियमासाठी मूळ फॉर्म ६ मध्ये कोणतीही सुधारणा किंवा दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्याऐवजी नवीन मतदारांना फॉर्म ६ सोबत एक स्वतंत्र घोषणापत्र भरून द्यावे लागत आहे. गेल्यावर्षी जून महिन्यात बिहारमध्ये राबवण्यात आलेल्या 'एसआयआर' मोहिमेदरम्यान या घोषणेचा सर्वप्रथम समावेश करण्यात आला होता. ऑनलाईन पद्धतीने फॉर्म ६ भरताना जोपर्यंत अर्जदार हे घो-षणापत्र पूर्ण करत नाही, तोपर्यंत त्याला अर्जाची पुढील प्रक्रिया पूर्ण करता येत नाही.

## स्लॅब कोसळला

मुंबई : मुंबई महापालिकेच्या अंधेरी पूनम नगर येथील के उत्तर प्रभाग कार्यालयातील सहाय्यक आयुक्तांच्या कार्यालयाचा पहिल्याच पावसात सीलिंग स्लॅब कोसळण्याची घटना गुरुवारी घडली. या घटनेत सुदैवाने कार्यालयातील कर्मचारी थोडक्यात बचावले.

# पायाभूत प्रकल्पांची निधीटंचाई दूर करण्यासाठी 'अर्बन चॅलेंज फंड'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना; ९० हजार कोटींचा प्रकल्प निधी प्रस्तावित

तभा वृत्तसेवा



मुंबई : शहरांच्या प्रगतीतील आर्थिक व प्रशासकीय अडथळे दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अर्बन चॅलेंज फंड' तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाधारित शहरी योजनांसोबतच, शहरांच्या संस्थात्मक आणि आर्थिक मर्यादांमुळे रखडणाऱ्या पायाभूत प्रकल्पांना गती देण्यासाठी हा फंड महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केला. या अभियानांतर्गत कर्ज रोखे आणि खासगी-सार्वजनिक भागीदारीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उभारणी केली जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी नगर विकास विभागाची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत 'अर्बन चॅलेंज फंड' अभियानाच्या सर्वसमावेशक आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यापूर्वी नाशिक आणि पुणे महानगरपालिकेने याच धर्तीवर यशस्वीपणे बाजारपेठेतून निधी उभारणी करून पाणीपुरवठा व स्वच्छतेचे मोठे प्रकल्प मार्गी लावले आहेत. या महानगरपालिकांच्या निधी उभारणीच्या प्रस्तावांना राष्ट्रीय सर्वोच्च समितीची (एनएसी) मंजुरी देखील मिळाली आहे. याच धर्तीवर आता आगामी काळात पिंपरी-चिंचवड आणि नागपूर महानगरपालिकेतील काही महत्त्वाच्या प्रकल्पांनाही या पद्धतीने निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत अर्बन चॅलेंज फंडासाठीच्या वित्तीय आकृतीबंधाबाबत सविस्तर सादरीकरण व चर्चा करण्यात आली. या एकूण अभियानात तब्बल हजार ९० हजार कोटींचा प्रकल्प निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रासाठी केंद्र शासनाचा वाटा ११ हजार २०० कोटी, राज्य शासनाचा वाटा ११ हजार २०० कोटी आणि बाजाराधारित स्रोतांतून (कर्ज रोखे व इतर) २२ हजार ४०० कोटी मिळून पहिल्या टप्प्यात एकूण ४४ हजार ८०० कोटींच्या महाप्रकल्पांना चालना दिली जाऊ शकते, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत शहरांचा कायापालट करण्यासाठी २२ प्रमुख घटकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने डिजिटल प्रशासन, मुख्य नागरी पायाभूत सुविधांचा विकास, चक्रीय अर्थव्यवस्था, शहरातील वाहतूक कोंडी कमी करणारे प्रकल्प आणि शेवटच्या टप्प्यातील जोडणी (लास्ट माईल कनेक्टिव्हिटी) यावर भर दिला जाईल. याशिवाय, ५ ते २० चौ. कि.मी. क्षेत्रातील शहर भागांचे पुनरुज्जीवन करणे, लहान व मध्यम शहरांना विकासाची नवी केंद्रे बनवणे, जुन्या परपेठांचे पुनर्विकास, पायी चालणारे व सायकलस्नेही वाहतूक प्रकल्प, निदर्शक प्रकल्प, ट्रान्झिट हब उन्नतीकरण, ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट अंतर्गत पायाभूत सुविधांचा विकास, शहर-विकास केंद्र, शहरांचे सृजनशील पुनर्विकास तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता प्रकल्पांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश असेल.

# सुनेत्रा पवारांना थेट पक्षातूनच विरोध?

तभा वृत्तसेवा



मुंबई : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून मोठी बातमी समोर येत आहे. सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीवर पक्षातील ज्येष्ठ नेत्याकडून आक्षेप घेण्यात आला आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदावर पक्षातूनच प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आल्याचं बघायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी थेट वकिलांमार्फत नोटीस पाठवून सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

सच्चिदानंद सिंह यांनी ९ जुलैला नोटीस बजावली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. ही नोटीस पक्षाचे अध्यक्ष या नात्याने सुनेत्रा पवार, कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रफुल्ल पटेल आणि पक्षाचे सचिव म्हणून ब्रिजमोहन श्रीवास्तव यांना बजावण्यात आली आहे.

नोटीसमध्ये २६ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेली राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक ही अवैध असल्याचे म्हटलं आहे. त्यामुळे ती निवड रद्द करून पुन्हा निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत स्वतंत्र आणि नि:पक्षपाती असा निवडणूक अधिकारी नेमून त्यांच्यामार्फत निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तोवर राष्ट्रीय अध्यक्ष आणि सुधारीत ाफिस बेअररची यादी ही रद्द समजावी, असेही नोटीसमध्ये बजावण्यात आले आहे.

# फडणवीस लवकरच सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहण्याचा विक्रम करतील

तभा वृत्तसेवा



मुंबई : भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत, ते महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहणारे नेते ठरतील, असा विश्र्वास व्यक्त केला. मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. नवनाथ बन म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांचे नाव महाराष्ट्रातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर पोहोचले असून, जनतेच्या पाठिंब्यामुळे भविष्यात ते अव्वल स्थान गाठतील. राज्याच्या विकासासाठी घेतलेल्या निर्णयांमुळे आणि विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे त्यांना सातत्याने जनतेचा आशीर्वाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी फडणवीस यांच्या कार्यकाळातील अटल सेतू, मुंबई मेट्रो, कोस्टल रोड, समृद्धी महामार्ग, बीडीडी चाळ पुनर्विकास आणि शेतकरी कर्जमाफीसारख्या निर्णयांचा उल्लेख केला. तसेच विरोधकांवरही त्यांनी जोरदार टीका केली.लाडकी बहीण योजनेवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत आणि काँग्रेसवर निशाणा साधत, ही योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, असा दावा त्यांनी केला. निवडणुकीत दिलेले दरमहा २१०० रुपयांचे आश्र्वासनही सरकार पूर्ण करेल, असे ते म्हणाले.राम मंदिराच्या मुद्द्यावरूनही त्यांनी विरोधकांवर टीका करत, समाजवादी पक्ष आणि काँग्रेससोबतची युती करताना उद्धव ठाकरे यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली.

याशिवाय, शरद पवार यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांचे कौतुक केल्याचा उल्लेख करत, महाविकास आघाडीत उद्धव ठाकरे यांचा पक्ष राजकीयदृष्ट्या एकटा पडत असल्याचाही दावा नवनाथ बन यांनी केला.

# महायुतीमध्ये महामंडळ वाटपाचा मुहूर्त ठरला?

### – ४८–२९–२२ चा फॉर्म्युला निश्चित; मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यादीवर करणार शिक्कामोर्तब



तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून रखडलेल्या आणि सत्ताधारी पक्षांतील नेत्यांसह कार्यकर्त्यांच्या नजरा लागून राहिलेल्या 'शासकीय महामंडळ' वाटपाचा अखेर मुहूर्त ठरला आहे. महायुतीमधील धुसफूस टाळण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना सत्तेत वाटा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः पुढाकार घेतला असून, भाजपसह मित्रपक्षांच्या नेत्यांना महामंडळांचे जागावाटप महिनाभरात पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, तिन्ही पक्षांमध्ये ४८-२९-२२ असा जागावाटपाचा अंतिम फॉर्म्युला निश्र्चित झाला असून, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या आगामी बैठकीत यावर अधिकृत शिक्कामोर्तब होणार आहे.

महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत झालेल्या प्राथमिक चर्चेनंतर आता अंतिम यादी तयार करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महायुतीमधील संख्याबळ लक्षात घेऊन महामंडळांचे वाटप निश्र्चित करण्यात आले आहे. त्यानुसार, भाजप ४८ टक्के महामंडळे, शिवसेना २९ टक्के आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २२ टक्के महामंडळे दिली जातील. विशेष म्हणजे महायुतीमधील एका छोट्या पक्षालाही १ टक्के जागांवर सामावून घेतले जाणार आहे. दरम्यान, कोणत्या पक्षाला नेमके कोणते महामंडळ (उदा. सिडको, म्हाडा, एसटी) मिळणार, हे अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले असले, तरी मुख्यमंत्र्यांसोबतच्या उच्चस्तरीय बैठकीत कोणत्या महामंडळावर कोणाची वर्णी लावायची, याचे अंतिम वाटप नावांसह निश्र्चित केले जाणार आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून महायुतीमधील वरिष्ठ नेते, माजी आमदार आणि निष्ठावंत पदाधिकारी महामंडळांसाठी 'देव पाण्यात बुडवून' बसले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर आता आपापल्या पक्षाच्या कोट्यातून महत्त्वाच्या महामंडळाची सूत्रे हस्तगत करण्यासाठी नेत्यांनी आत्तापासूनच मोर्चेबांधणी आणि अंतर्गत लॉबिंग सुरू केले आहे.

# काश्मीरसाठी 'चलो दिल्ली'!

## राज्याच्या दर्जासाठी २० जुलैपासून आंदोलनाची अब्दुल्ला यांची घोषणा

वृत्तसंस्था



जम्मू:जम्मू-काश्मीरचा राज्याचा दर्जा पुनर्स्थापित करण्याच्या मागणीसाठी केंद्र सरकारविरोधात दिल्लीत जंतरमंतरवर २० जुलैपासून आंदोलन करण्याची घोषणा मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी रविवारी केली. त्यामुळे काश्मीर साठीचा हा लढा दिल्लीच्या मैदानातून सुरू होणार असल्याचे चित्र आहे. मुख्यमंत्री अब्दुल्ला यांनी जम्मूमध्ये राज्याच्या दर्जासाठी रविवारी सभा घेतली. 'दिल्ली चलो', 'आम्हाला आमचा राज्याचा दर्जा परत करा' अशा आशयाचे पोस्टर या सभेत सर्वत्र झळकावण्यात येत होते. या सभेत बोलताना त्यांनी राज्य दर्जाच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारला लक्ष्य केले.आम्ही केंद्र सरकारला पुरेसा वेळ दिला. दोन वर्षे संवादाची भूमिका घेतली. मात्र, आता आम्ही नव्या रणनीतीचा अंगीकार करणार आहोत,' असे सांगत अब्दुल्ला यांनी २० जुलैपासून दिल्लीत आंदोलन करण्याची घोषणा केली. 'जम्मू-काश्मीरला 'योग्य वेळी' राज्याचा दर्जा बहाल करणार असल्याचे केंद्र सरकार सांगत आहे. ही 'योग्य वेळ' म्हणजे जम्मू-काश्मीरमध्ये भाजप सत्तेवर येईल तेव्हा का?, असा प्रश्न ओमर अब्दुल्ला यांनी केला. 'दिल्लीतीलजंतरमंतरयेथे नॅशनल कॉन्फरन्सच्या आंदोलनावर भाजप नेते प्रश्न उपस्थित करीत आहेत. दिल्लीत आंदोलन करून राज्य दर्जा मिळणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र, दिल्लीत नाही तर कुठे आंदोलन करणार? देशातील एका भागाशी संबंधित निर्णय राजधानीत होणार नाही तर कुठे होणार,' असा प्रश्न ओमर अब्दुल्ला यांनी केला.

## ९२ लाख महिला कमी

तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्रातील सर्वात जास्त गाजलेली सरकारी योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. या योजनेमुळेच राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्याचे अनेक जाणकारांचे मत आहे. आता मात्र या लाडक्या बहीण योजनेतून मोठ्या प्रमाणात महिलांना वगळण्यात येत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील १० नोंदणी केलेल्या महिलांपैकी जवळपास ४ महिलांना लाभार्थींच्या यादीतून काढून टाकण्यात आलं आहे.

# बारशापूर्वीच नवविवाहितेची आत्महत्या; कोल्हापूरातील धक्कादायक घटना

तभा वृत्तसेवा



कोल्हापूर: कोल्हापूरच्या (घेश्र-हर्रीी) राजारामपुरी परिसरात २१ वर्षीय नवविवाहितेने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर मृत विवाहितेच्या कुटुंबीयांनी पतीसह सासरच्या मंडळींवर मुलगी जन्माला आल्यामुळे छळ केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

मृत विवाहितेचे नाव अस्मिता काटकर असे असून, त्यांच्या मुलीचा बारसा १५ जुलै रोजी होणार होता. मात्र, त्यापूर्वीच ही दुर्दैवी घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत महिलेच्या आई आणि भावाने सासरच्या मंडळींवर मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोप केला आहे. मुलगा न झाल्यामुळे आणि मुलगी जन्माला आल्याने अस्मितावर सतत दबाव टाकला जात होता, असा दावा त्यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घटनेच्या वेळी अस्मिताचे पती, सासू आणि सासरे बारशासाठी हॉल पाहण्यासाठी घराबाहेर गेले होते. अस्मिता घरी एकट्या असताना त्यांनी घराचा दरवाजा आतून बंद करून बेडरूममध्ये छताच्या पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतला. काही वेळाने कुटुंबीय घरी परतल्यानंतर दरवाजा आतून बंद असल्याचे लक्षात आले. अनेकदा हाक मारूनही प्रतिसाद न मिळाल्याने शेजाऱ्यांच्या मदतीने दरवाजा तोडण्यात आला. त्यावेळी अस्मिता गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. मृत्यूमागील (ऊशरींह) नेमके कारण आणि कुटुंबीयांनी केलेल्या आरोपांची चौकशी सुरू असून, तपासानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# पश्चिम द्रुतगती महामार्गासाठी पर्यायी मार्ग

## गोरेगाव–मुलुंड लिंक रोडचा पहिला टप्पा पूर्ण

तभा वृत्तसेवा



मुंबई : शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मुंबई महापालिकेने गोरेगाव-मुलुंड लिंक रोड हा प्रकल्पा हाती घेतला आहे. या प्रकल्पाचं काम मुख्य चार टप्प्यात केलं जात आहे. यामध्ये उड्डाणपुलांसह संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या जुळ्या भुयारी बोगद्यांचाही समावेश आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याचं काम आता अंतिम टप्प्यात आहे. दिंडोशी कोर्टापासून ते गोरेगाव फिल्मसिटी पर्यंत जोडणाऱ्या उड्डाणपुलाचं काम पूर्ण करून तो सप्टेंबरमध्ये प्रवाशांसाठी खुला करण्यात येणार आहे. मुंबईतीलपश्र्चिम द्रुतगती महामार्गावरीलकोंडी फोडण्यास मदत होणार आहे. पश्र्चिम उपनगरातील दिंडोशी कोर्टापासून ते गोरेगावमधील फिल्मसिटीपर्यंत असलेला हा पूल १. २ किमी लाबं आहे. गोरेगाव मुलुंड लिंक रोडचा हा पहिला टप्पा आहे. पश्र्चिम द्रुतगती महामार्गाला लागून असलेल्या दिंडोशी कोर्टापासून हा उड्डाणपूल सुरू होईल आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापर्यंत जाऊन संपेल. प्रकल्पातील उर्वरित काम सध्या पूर्ण झालेलं नाही. त्यामुळे तिथून वाहन चालक इतर मार्गांच्या सहाय्याने पूर्व उपनगरात प्रवास करू शकतील. हा उड्डाणपूल सुरू झाल्यावर वाहनचालकांना पश्र्चिम द्रुतगती मार्गासाठी एक नवीन पर्याय मिळणार आहे.पुढील टप्प्यात या उड्डाणपुलावरून गोरेगाव-मुलुंड लिंक रोडच्या जुळ्या बोगद्यांपर्यंत पोहोचता येणार आहे. या बोगद्यांचं काम २०२७पर्यंत पूर्ण होईल अशी शक्यता आहे. हे दोन्ही मार्ग कार्यन्वित होताच शहरातील पूर्व आणि पश्र्चिम उपनगरांमधील वाहतूक कोंडी फुटणार आहे. या पूर्व हा उड्डाणपूल मे महिन्यापर्यंत खुला करण्याचं उद्दिष्ट होतं. पावसाळ्यापूर्वी मार्ग सुरू करूनपावसाळ्यातहोणारी वाहतूक कोंडी फुटेल अशी आशा होती. पण काही कामांना विलंब झाल्यामुळे ही तारीख पुढे ढकलण्यात आली होती. आता सप्टेंबरमध्ये मार्ग प्रवाशांसाठी खुला होईल अशी आशा आहे. गोरेगाव-मुलुंड लिंक रोड १२. २ किमी लांब कॉरिडोर आहे. या मार्गावर भुयारी बोगदे, पूल आणि इंटरचेंजचा समावेश आहे. हा मार्ग पूर्ण होताच पश्र्चिम उपनगरांमधील गोरेगावला पूर्व उपनगरांधील मुलुंडशी जोडण्यात येणार आहे. सध्या मुंबईमध्ये थेट पूर्व-पश्र्चिम जोडणारा कोणताही मार्ग नाही.

पहिल्या टप्प्यातील उड्डाणपूल सहा पदरी असेल. त्यावर एका उन्नत फलाटावर वर्तुळाकार इंटरसेक्शन असतील. याशिवाय पादचाऱ्यांसाठी पुलाच्या दोन्ही बाजूंना पदपथे बांधली जातील. मुंबई महापालिकेनेसंपूर्ण गोरेगाव-मुलुंड लिंक रोडसाठी २०२८ची डेडलाइन दिली आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी १४,००० रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यापैकी उड्डाणपुलासाठी ३०० कोटी रुपये वापरण्यात आले आहेत. या उड्डाणपुलाचं बांधकाम पूर्ण झालं असून डांबरीकरण, सिग्नल उभारणी, दिशादर्शक फलकं आणि इतर किरकोळ कामं शिल्लक आहेत.




CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तीर्थ बुद्रुक वैराग्यधामात १५ जुलैला पुण्यतिथी सोहळा

### आ. बसवराज पाटील यांचा होणार सत्कार...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जुलै -**
तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथील वैराग्यधामात केदारपीठाचे लिंगायत जगद्गुरू श्री सिद्धेश्वरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार, १५ जुलै रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला केदारपीठाचे विद्यमान जगद्गुरू श्री भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी, पंढरपूर मंदिर समितीचे सहअध्यक्ष

हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर, विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत.



याच प्रसंगी विधान परिषदेवर नवनिर्वाचित आमदार बसवराज पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

धार्मिक कार्यक्रमांसह आयोजित या सोहळ्यास भाविक व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वैराग्यधाम समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### जवाहर विद्यालय अणदूरच्या मुख्याध्यापकांसह विद्यार्थिनींचा गौरव

**अणदूर, दि.१३ जुलै -**
जवाहर विद्यालय, अणदूरचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी तसेच दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के गुण मिळविणाऱ्या भक्ती कबाडे आणि संस्कृती घोडके यांचा लातूर येथे गौरव करण्यात आला. उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आणि आ. विक्रम काळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांना 'आदर्श शाळा मुख्याध्यापक गौरवपत्र' व 'गुणवंत विद्यार्थी गौरवपत्र' प्रदान करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, विधान परिषद सदस्य बसवराज पाटील, श्रीगुरू औसेकर महाराज आणि आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. यावेळी लातूर, धाराशिव व नांदेड जिल्ह्यातील दहावी परीक्षेत पैकीच्या पैकी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह त्यांच्या शाळांच्या मुख्याध्यापकांचाही गौरव करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, लक्ष्मीकांत पाटील, भालचंद्र बिराजदार, नागनाथ कानडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### विजय शिंगाडे यांची भाजप ओबीसी मोर्च्याच्या जिल्हाध्यक्षपदी फेरनियुक्ती

**मंगरूळ, दि.१३ जुलै -**
भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी विजय शिंगाडे यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी नियुक्तीपत्र देऊन ही घोषणा केली.



विजय शिंगाडे हे विद्यार्थीदशेपासून भाजपचे सक्रिय कार्यकर्ते असून कसई गावाचे सरपंच म्हणून त्यांनी यशस्वी कारकीर्द गाजवली आहे. फेरनियुक्तीबद्दल जिल्हाभरातून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी मोर्चाचे संघटन अधिक सक्षम, सशक्त व जनाभिमुख होईल, असा विश्वास दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी व्यक्त केला. समाजहित, राष्ट्रहित आणि पक्षवाढीसाठी समर्पित भावनेने कार्य करून भाजपची विचारधारा अधिक व्यापकपणे जनतेपर्यंत पोहोचवावी, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

### पदोन्नतीने एएसआयपदी महादेव राऊत यांची निवड

**मंगरूळ, दि.१३ जुलै -**
तुळजापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले महादेव भगवान राऊत यांची सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार करण्यात आला.



पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, फेटा व पेढा देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. महादेव राऊत यांनी पोलीस दलात ३० वर्षे प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवा बजावली आहे. गडचिरोली, वाशी, परांडा, कळंब आदी ठिकाणी सेवा केल्यानंतर ते सध्या तुळजापूर पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. यावेळी उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.



### हायस्कूल लोहारा येथे दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**लोहारा, दि.१३ जुलै -**
लोहारा शहरातील हायस्कूल लोहारा येथे सोमवारी (दि. १३) इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाला विस्तार अधिकारी रसुल शेख प्रमुख पाहुणे म्हणून, तर मुख्याध्यापक डी. एम. पोतदार अध्यक्षस्थानी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक पोतदार यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवकर यांनी केले. सूत्रसंचालन सतीश जट्टे यांनी, तर आभारप्रदर्शन सुतार यांनी केले. या प्रसंगी पालक, शिक्षकव विद्यार्थी उपस्थित होते.

### सव्वातीन लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.१३ जुलै -**
धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी १२ जुलै रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष वाहतूक तपासणी मोहीम राबवून मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध ३६४ कारवाया केल्या. या कारवाईत नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून एकूण ३ लाख २४ हजार ४५० रुपये तडजोड शुल्क (दंड) वसूल करण्यात आला.

# आषाढी यात्रेसाठी धाराशिव एसटी सज्ज

## पांडूरंगाच्या वारकऱ्यांसाठी जिल्ह्यातून १७० एसटी बससेंची व्यवस्था...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**
आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



पंढरपूर येथे २५ जुलै रोजी होणाऱ्या आषाढी यात्रेनिमित्त धाराशिव विभागाच्या राज्य परिवहन महामंडळाने वारकऱ्यांच्या सोयीसाठी व्यापक नियोजन केले आहे. यात्रेसाठी धाराशिव जिल्ह्यातून एकूण १७० बसांची व्यवस्था करण्यात आली असून, चालक-वाहकांसह वाहतूक निरीक्षक, यांत्रिकी कर्मचारी, लिपिक आदी अधिकारी-कर्मचाऱ्यांचीही मोठ्या प्रमाणात नियुक्ती करण्यात आली आहे.

२० जुलैपासून राज्यासह परराज्यातील लाखो वारकरी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करत आहेत. भाविकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी धाराशिव विभागातील सहा आगारांकडून तीन टप्प्यांत बससेवा राबविण्यात येणार आहे.

धाराशिव विभागाकडे सध्या एकूण ४०६ बस उपलब्ध आहेत. त्यापैकी २० ते २४ जुलै या पहिल्या टप्प्यात ९५ बस, तर २५ व २६ जुलै रोजी दुसऱ्या टप्प्यात १७० बस यात्रेसाठी कार्यरत राहतील. तसेच २७ ते २९ जुलै या तिसऱ्या टप्प्यातही १७० बस वारकऱ्यांच्या परतीच्या प्रवासासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या सर्व बसफेऱ्या पंढरपूर येथे यात्रेनिमित्त उभारण्यात येणाऱ्या भीमा यात्रा बसस्थानकाच्या शेड क्रमांक ५ येथून नियोजित करण्यात येणार असून, भाविकांना वेळेत आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळावी यासाठी एसटी प्रशासनाने आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण केली आहे.




# महिलेवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**
तुळजापूर तालुक्यातील एका गावात शेतात काम करणाऱ्या २४ वर्षीय विवाहित महिलेवर धमकी देत जंगलात नेऊन लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात संबंधित तरुणाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### विरोध करणाऱ्या पती व दिरालाही मारहाण...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला (नाव व गाव गोपनीय) ११ जुलै रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता शेतात काम करत असताना गावातील एका तरुणाने तिच्याकडे येऊन, तू मला आवडतेस, माझ्यासोबत जंगलात चल; नाही आलीस तर तुझ्या नवऱ्याला मारून टाकीन, अशी धमकी दिली. त्यानंतर तिला जबरदस्तीने जंगलात घेऊन जाऊन मारहाण करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर पीडितेचे पती व दिर यांनी संबंधित तरुणाला जाब विचारण्यासाठी गेल्यानंतर आरोपीने त्यांनाही काठीने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

पीडित महिलेने १२ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### कात्री येथे घरफोडी...

# सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा १.३५ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**
तुळजापूर तालुक्यातील कात्री येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने आणि शेजारील घरासमोरील मोटारसायकल असा एकूण १ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शरद साहेबराव सोनवणे (वय ४०, रा. कात्री, ता. तुळजापूर) यांच्या घराचा कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने ११ जुलै रात्री १० ते १२ जुलै पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान घरात प्रवेश केला. घरातील १५ ग्रॅम वजनाचे सुमारे ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

याचवेळी चोरट्याने शेजारील शंभू कुंडलीक येल्लाळ यांच्या मालकीची एमएच-२५ बीई-७८२० क्रमांकाची सुमारे ६० हजार रुपये किमतीची मोटारसायकल देखील लंपास केली.



या प्रकरणी शरद सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे.

# गोळीबार प्रकरणातील आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी शिंदे कुटुंबाचे उपोषण



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ जुलै -**
परंडा तालुक्यातील लोणी येथे २१ ऑक्टोबर २०२४ रोजी विठ्ठल सर्जेराव शिंदे यांच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याच्या निषेधार्थ शिंदे कुटुंबाने १३ जुलैपासून परंडा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

शिंदे कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणी २०२४ मध्ये परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मात्र, संबंधित आरोपींना पोलिसांकडून सहकार्य केले जात असून तपासात दिरंगाई आणि निष्काळजीपणा होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित काही व्यक्तींविरुद्ध १० जुलै २०२६ रोजी परंडा पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर संबंधित आरोपींनी आमच्या विरोधात अर्ज का दिला? असा जाब विचारत मध्यरात्री शिंदे यांच्या घरावर दगडफेक केल्याचा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेमुळे आपल्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

गोळीबार प्रकरणातील सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच कुटुंबाला संरक्षण द्यावे, या मागण्यांसाठी विठ्ठल सर्जेराव शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांनी परंडा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

### मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**
बसस्थानकाच्या आउटगेटसमोर मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकास तानाजी रेडकर (वय ४६, रा. बेंबळी, ता. जि. धाराशिव) हे रविवारी (दि. १२) सायंकाळी ५.२२ वाजण्याच्या सुमारास एमएच-२५ एएम-६७९९ क्रमांकाची दुचाकी मद्यधुंद अवस्थेत चालविताना बसस्थानकाच्या आउटगेटसमोर आढळून आले.

याप्रकरणी मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मयत व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करून शेतजमिनीचा व्यवहार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**
मयत व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करून शेतजमिनीचा व्यवहार करत वारसाची फसवणूक केल्याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हमीद हारुण अरब (वय ४२, रा. जवळा (नि.), ता. परंडा, ह.मु. सत्याईनगर, दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी महंमद इसा हबीब (रा. ताडकळस, ता. भोकरदन, जि. जालना), अली सय्यद कादरी, भागवत नामदेव गवारे आणि अदील अली कादरी (रा. जवळा (नि.), ता. परंडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, फिर्यादीचे आजोबा हबीब अल्वीविन महम्मद अरब यांचे निधन झालेले असतानाही आरोपींनी ही बाब माहिती असताना मयत व्यक्ती आणि आरोपी महंमद इसा हबीब हे एकच व्यक्ती असल्याचा भास निर्माण केला.




### चौघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल...

त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नाव बदलल्याचा आधार घेत जवळा (नि.) शिवारातील गट क्रमांक १३०७ मधील सामाईक ८९ आर क्षेत्रापैकी फिर्यादीच्या आजोबांच्या वाट्याचे १४.८३ आर क्षेत्र इतर सहमालकांची संमती न घेता खरेदीखताद्वारे हस्तांतरित करून फिर्यादीची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

१२ जुलै रोजी दाखल झालेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# धाराशिव शहरालगत ट्रकची मोटारसायकलला धडक; वाशी तालुक्यातील व्यक्तीचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**
धाराशिव शहराजवळील उपळा पुलानजीक मधुबन हॉटेलसमोर भरधाव ट्रकने मोटारसायकलला समोरून धडक दिल्याने वाशी तालुक्यातील एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनायक काशिनाथ पवार (वय ५७, रा. घाटपिंप्री, ता. वाशी, जि. धाराशिव) हे ११ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास एमएच-१७ बीएफ-७७५० क्रमांकाच्या




मोटारसायकलवरून जात होते. त्यावेळी उपळा पुलाच्या पुढे मधुबन हॉटेलजवळ एमएच-१० एक्यू-३००६ क्रमांकाच्या ट्रकच्या चालकाने ट्रक भरधाव व निष्काळजीपणे चुकीच्या दिशेने चालवत मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात विनायक पवार गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी शिवाजी पंढरीनाथ पवार (रा. घाटपिंप्री, ता. वाशी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लोहारा येथे प्रतिबंधित गुटखा विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; साहित्य जप्त

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ जुलै -**
लोहारा तालुक्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत गुटख्यासह ११ हजार ५९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संबंधिताविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पांडुरंग काशिनाथ कदम (वय ५९, रा. बंगले प्लॉटिंग, लोहारा) हे ११ जुलै रोजी रात्री सुमारे ९ वाजता लोहारा-जेवळी मार्गावरील जीवन पान स्टॉल येथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बाळगून असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. यानुसार पथकाने छापा टाकून गुटखा, विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू आदी प्रतिबंधित पदार्थ असा एकूण ११ हजार ५९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पांडुरंग कदम यांच्याविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# एनएच-६५ वर कार अडवून दरोडा; एकाला अटक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**
हैदराबाद-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील फुलवाडी पाटीजवळ कारमध्ये विश्रांती घेत असलेल्या दोघांना चाकू व लोखंडी टॉमीचा धाक दाखवत मारहाण करून सुमारे १.६५ लाख रुपयांचा ऐवज लुटल्याची घटना घडली. या प्रकरणी नळदुर्ग पोलिसांनी एका संशयिताला अटक केली असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अभिजीत संजीव रेड्डी (वय ३०, रा. एलआयजी-२१, हाउसिंग बोर्ड कॉलनी, हुमनाबाद, जि. बिदर) हे मित्रासह ११ जुलै रोजी कारने हुमनाबादहून पुण्याकडे जात होते.

पहाटे सुमारे २.३० वाजता तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी पाटीजवळील एनएच-६५वर रोडलगत विश्रांतीसाठी कार थांबवली असता चार अनोळखी इसमांनी त्यांना चाकू व लोखंडी टॉमीचा धाक दाखवून कारची काच उघडण्यास भाग पाडले.




त्यानंतर आरोपींनी लोखंडी टॉमीने मारहाण करून १५ हजार रुपये रोख, एक तोळ्याची सोन्याची चैन, दोन तोळ्यांचा चांदीचा कडा आणि मोबाईल फोन असा एकूण १ लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज जबरीने लुटून नेला. या प्रकरणी अभिजीत रेड्डी यांनी १२ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी जाविद इमाम सय्यद (वय ३३, रा. मुस्ती, ता. दक्षिण सोलापूर) याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्याने सदर दरोड्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली असून, गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

## अग्रलेख

# भट्टीच्या भगतांना ठेचा!

वेगवेगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करीत भारतातील काही भरकटलेल्या (?), गरीब आणि शिक्षित पण अडाणी युवकांना जाळ्यात ओढून त्यांच्यामार्फत घातपाती कारवाया करता येतील काय, याची चाचपणी पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भाटी ऊर्फ भट्टी याने केल्याचा प्राथमिक पुरावा सापडला आहे. १० जुलैला अर्थात शुक्रवारी दहशतवादविरोधी पथकाने महाराष्ट्रात एकाचवेळी राज्यात १०२ ठिकाणी छापेमारी केली. केंद्रीय गुप्तचर संस्था आणि राज्यातील गुप्तचर संस्थांना मिळालेल्या माहितीच्या आधारे एटीएसने नेहमीच अतिसंवेदनशील आणि देशविघातक कारवायांमध्ये सक्रिय असलेल्या शहरांमध्ये धाडी टाकल्या. त्यांनी अशाने अनेक कारवाया रोखल्या. गुरुवारी (ता. ९) रात्रीपासून दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत झाडाझडती घेतली. यामध्ये मुंबई, ठाणे, कुर्ला, वांद्रा, मीरा रोड, भाईंदर, सांगली, सातारा, छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, गडचिरोली व वर्धा या शहरांचा समावेश होता. छाप्यांमध्ये एकूण १११ पेक्षा जास्त 'भट्टीप्रेमीं'ना चौकशीसाठी ताब्यात घेतले. धर्मासाठी आंधळे होऊन काहीही करण्यासाठी तयार असलेल्या या युवकांच्या सोशल मीडिया हालचालींवर लक्ष ठेवून आणि अनोळखी प्लॅटफॉर्मचा वापर करीत त्यांच्याशी संवाद साधण्याचे काम शहजाद भट्टीची संघटना करीत असते. आर्थिक लाभ आणि धर्मविषयक संदेश देऊन युवकांचे स्थानिक पातळीवर जाळे निर्माण करण्याचे काम यामार्फत केले जाते. १९९० नंतर पाकिस्तानने स्थानिक पातळीवर युवकांचे जबरदस्त जाळे निर्माण करीत जम्मू-काश्मीरला अशांत करण्याचे काम केले. हेच युवक नंतर स्लीपर सेलची भूमिका पार पाडत असतात. पहलगाम हल्ल्यासाठी आलेल्या दहशतवाद्यांना आश्रय देण्याचे काम अशाच स्लीपर सेलमधील सदस्यांनी केल्याचे उघड झाले आहे. आपल्याला साहाय्यभूत ठरेल, अशा राज्यांमध्ये कारवाया वाढविण्याचे काम शहजाद भट्टी करीत आहे. झारखंड आणि पंजाब ही याची ताजी उदाहरणे. कमी खर्चातील शस्त्रे आणि स्फोटकांचा वापर करीत समाजात दहशत माजविणे आणि परिस्थितीचा अदमास घेण्याचे काम भट्टी करीत असतो. मे आणि जून महिन्यात पंजाबमध्ये पोलिसांवर गोळीबार केल्याच्या घटनांमागे शहजादची संघटना असल्याचे स्पष्ट झाले. गेल्या महिन्यात १७ जूनला झारखंडमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात झालेला बॉम्बस्फोटही भट्टीनेच घडवून आणल्याचा दाट संशय आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील छापेमारीच्या दोन दिवस अगोदर भट्टी तसेच पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित दोन मोड्यूल्सचा भंडाफोड केला. दिल्लीसह देशभरात गर्दीच्या ठिकाणी पेट्रोल बॉम्बचा वापर करीत स्फोट घडविण्याची कुटिल योजना या सहा जणांनी आखल्याचे चौकशीत उघड झाले आहे. हाच धागा पकडून दोन दिवसांनंतर राज्यात एटीएसला मोठी कारवाई करावी लागली. अशा लोकांचा देशद्रोह म्हणा की गद्दारी, भारताला त्रास होतच आला आहे. शेकडो वर्षांपासून हे चालत आलेले आहे आणि याचे पुरावे इतिहासातही आहेत. ज्या ताटात खाल्ले, त्याच ताटाला लाथ मारणारी ही प्रवृत्ती. ती आणखी बळावत चालली आहे, हा खरा चिंतेचा विषय. शिक्षणाने माणूस सुज्ञ होतो, भल्याबुऱ्याची त्याला जाणीव होते, असे जे म्हटले जाते, त्याला धर्मांध दहशतवादी अपवाद आहेत. डॉक्टर, इंजिनीयर झालेले युवकही दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी झाल्याची उदाहरणे डोळ्यासमोर आहेत. खरे तर हे अस्तनीत लपलेले विषारी साप आहेत. अज्ञानी, गरीब आणि भरकटलेले युवक म्हणत त्यांच्या देश आणि समाजविघातक कृत्यांकडे पांघरूण घालण्याचे जे पाप काँग्रेसने दीर्घ काळ केले, त्याचे परिणाम आपण आता भोगत आहोत. शहजाद भट्टी हा पाकिस्तानी असून सध्या तो दुबईत व्यावसायिक म्हणून वावरत आहे. त्याचे ३३३ नावाने सोशल मीडियावर अकाऊंट असून त्याने आशियात फार मोठे डिजिटल नेटवर्क उभे केले आहे. तो अट्टल गुन्हेगार असून त्याच्यावर लाहोर आणि परिसरात चोरी, दरोडा, खून, लुटमारीचे शेकडो गुन्हे आहेत. माणूस म्हणूनही तो नीच असून त्याच्यावर २०१५ मध्ये बलात्काराचा गुन्हाही दाखल झालेला आहे. पोलिसांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी शहजादने दुबई गाठत प्रथम तेथे भंगाराचा व्यवसाय सुरू केला. नंतर हळूहळू त्याने दूध आणि कृषी उत्पादने विकण्याचे कामही सुरू केले. आज तो कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीचा मालक असून त्याला आता आयएसआयचे संरक्षण मिळाले आहे. २०१३ मध्ये जो शहजाद पाकिस्तानी पोलिसांसाठी मोस्ट वाँटेड होता, तो आता पाकिस्तानच्या गळ्यातील ताईत झाला आहे. बलात्काराचा कलंक असलेल्या या शहजादने सोशल मीडियावरील आपल्या अकाऊंटचे नाव ३३३ असे मुद्दाम ठेवले आहे. अंकशास्त्रात ३ हा आकडा मन, शरीर आणि आत्मा यांना जोडणारा आणि सृजनाचे प्रतीक मानले जाते. तसेच मी तुमचा मार्गदर्शक असून देवदूत आहे, हे दर्शविण्यासाठीही ३३३ या आकड्याचा वापर केला जातो असे म्हणतात. याचाच अर्थ शहजाद भट्टी विशिष्ट धर्माच्या युवकांना आकर्षित करून त्यांच्यामार्फत भारतात अराजक निर्माण करण्याचा कट आखत होता किंवा आखतोय. जून महिन्यात दिल्ली पोलिसांनी आयएसआय संबंधित ज्या नऊ दहशतवाद्यांना अटक केली होती, त्यांनी टीटीएच या नव्या दहशतवादी गटाचा उल्लेख पोलिसांच्या चौकशीत केला होता. टीटीएचचा अर्थ होतो तो तेहरिक-ए-तालिबान हिंदुस्थान. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या धर्तीवर भारतातही असे नेटवर्क उभारण्याच्या मागे शहजादचाच मेंदू असल्याची शक्यता सुरक्षा संस्थांनी व्यक्त केली आहे. हे नेटवर्क तयार करण्यासाठी भट्टीने प्रथम पंजाब, दिल्ली, हरयाणा, राजस्थान आणि उत्तरप्रदेशकडे लक्ष केंद्रित केले आहे. झारखंड, महाराष्ट्र आणि बिहारातही त्याचे चाहते निर्माण झालेत. हे काम करण्यासाठी युवकांना भरपूर पैसे देण्याचे आणि विदेशात स्थायिक करून देण्याचे आमिषही दिल्याचे उघड झाले आहे. पण त्यांचे मनसुबे यशस्वी होणार नाहीत.

कारण आता देश बदलला आहे. तो घरात घुसून मारतो हे भट्टीच्या पाठीराख्यांनी पाहिले आहे. असे शहजाद भट्टीसारखे किती आले आणि मातीत मिसळले: पण या देशाचे कुणीही वाकडे करू शकले नाही. कधीकाळी या देशात अल-कायदापासून तर अलिकडच्या पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या 'द रजिस्टन्स फ्रंट'सारख्या जवळपास १८ इस्लामिक नावे असलेल्या दहशतवादी संघटना कार्यरत होत्या. आज त्यांचे नामोनिशाण जवळजवळ मिटले आहे. याच दहशतवादी संघटनांच्या उच्छादामुळे जम्मू-काश्मीरसह संपूर्ण भारत तीन दशके हिंसाचाराच्या घटनांनी रक्तबंबाळ झाला होता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या कठोर उपोययोजनांमुळे दहशतवादी संघटनांचे म्होरके यमसदनी गेले आहेत. कधीकाळी पाकिस्तानचा 'पोस्टर बॉय' बुऱ्हान वानीने अख्खे काश्मीर खोरे अनेक वर्षे वेठीस धरले होते. २०१६ मध्ये जुलै महिन्यात अनंतनाग जिल्ह्यातील कोकेरनाग येथे लष्कराने त्याचा फणा ठेचला आणि येथूनच सुरू झाली ती जम्मू-काश्मीर दहशतवादमुक्त करण्याची मोहीम. जे काश्मीर खोरे पाकिस्तानी, अफगाणी आणि अरब देशांतील दहशतवाद्यांनी बरबटले होते, ते आता मुक्तपणे श्वास घेत आहे. पैसे घेऊन दगडफेक करणारी पिलावळ आता बिळात लपून बसली आहेत. भट्टी आपला नाही; त्याच्या डावपेचांना साथ देणारे आपल्या देशात राहतात हे या घटनांत दिसले. भट्टीचा बंदोबस्त होईलच. भारतात राहून भट्टीसारख्या लोकांना साथ देणाऱ्यांना विनाविलंब ठेचले पाहिजे. भट्टीसारख्यांचे भगत शोधून संपवले पाहिजेत. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# बांगलादेशचे 'रेड कार्ड'!

अमेरिका- तेथे स्थायिक होणाऱ्या विदेशी नागरिकांना 'ग्रीन कार्ड' जारी करते, युरोपियन युनियन तेथे काम करणाऱ्या विदेशी नागरिकांना 'ब्लू कार्ड' जारी करते आणि चीन? आपल्या देशाचे मांडलिक होणाऱ्या देशांना 'रेड कार्ड' जारी करतो. बांगलादेशने नुकतेच 'चीनचे नागरिकत्व' म्हणजे रेड कार्ड घेतले आहे.

**भारताचे अपत्य :** बांगलादेश म्हणजे भारताचे अपत्य. भारताने अतिशय दूरदर्शीपणा दाखवित ५५ वर्षांपूर्वी पाकिस्तानचे दोन तुकडे केले आणि पूर्व पाकिस्तानला बांगलादेश म्हणून मान्यता दिली. १९७१ च्या त्या घटनेपासून भारत-बांगलादेश संबंध 'अतूट' होते. आता हे संबंध पूर्णपणे संपुष्टात आले असून, बांगलादेशने चीनचे 'पितृत्व' मान्य केले आहे.

**पहिला दौरा चीनचा :** बांगलादेशचे युवा पंतप्रधान तारीक रहेमान यांचा पहिला परदेश दौरा चीनचा झाला आणि त्यांनी चीनसोबत अनेक करारांवर सह्या केल्या, त्या भारतासाठी अतिशय संकटाच्या ठरणार आहेत.

**चीनचा हात :** बांगलादेशात दीड-दोन वर्षांपूर्वी शेख हसीना यांच्या सरकारविरोधात जो उठाव झाला, त्यामागे पाकिस्तान व चीन आहेत, असे म्हटले जात होते. यात चीनची भूमिका मुख्य व मोठी होती असेही मानले जात होते. त्यावर नंतरच्या घटनाक्रमाने शिक्कामोर्तब होत आहे.

**'रॉ' गाफील :** पाकिस्तान व चीन बांगलादेशात सत्ताबदलाचे कारस्थान आखत असताना, भारताच्या 'रॉ' या गुप्तचर संस्थेला याचा जराही मागमूस लागू नये हे खरोखरीच दुर्दैवी होते. पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर बांगलादेशातून पलायन करण्याची वेळ आल्यानंतर, भारत सरकारला या गंभीर संकटाची कल्पना आली. पण, तोपर्यंत वेळ निघून गेली होती. शेख हसीना यांना भारतात आश्रय देण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला, जो अतिशय योग्य असाच होता. पण, बांगलादेशात सत्तापरिवर्तनाचा पहिला टप्पा पूर्ण झाला होता. चीनचे कारस्थान सफल झाले होते.

**मांडलिक पंतप्रधान :** बांगलादेशात प्रारंभी काही काळ मोहम्मद युनूस या अर्थशास्त्री असणाऱ्या नेत्यास काळजीवाहू सरकारचे प्रमुख करण्यात आले. तेव्हापासूनच त्यांची पावले चीनच्या दिशेने पडू लागली होती. तेथे निवडणुकीनंतर तारीक रहेमान सत्तेवर आल्यानंतर चीनच्या दिशेने पडणाऱ्या पावलांची गती वाढली व आता पहिल्या विदेश दौऱ्यासाठी चीनची निवड करून तारीक रहेमान यांनी चीनचे मांडलिकत्व स्वीकारण्याची प्रक्रिया एकप्रकारे पूर्ण केली.

**'पाकिस्तानी पॅटर्न' :** पाकिस्तानवर आपली पकड मजबूत करण्यासाठी चीनने तेथे चायना-पाकिस्तान एकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणजे 'सीपीईसी' या नावाचा एक प्रकल्प सुरू केला. त्यात चीनने ४५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. रेल्वे मार्ग, रस्ते, वीज केंद्रे, विमानतळ आणि पाकिस्तानचे ग्वादर बंदर विकसित करण्याचा हा प्रकल्प राबवून चीनने पाकिस्तानला आपल्या पिंजऱ्यात बंद केले आहे. याशिवाय चीनने आपले लष्करी तंत्रज्ञान पाकिस्तानला देणे सुरू केले आहे.

**आता बांगलादेशातही :** चीनने आता बांगलादेशातही असाच प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारच्या प्रस्तावावर दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू असून, त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, असे कळते. चीनचे कनमिंग बंदर बांगलादेशच्या मोंगला बंदराशी जोडले जाणार आहे. म्हणजे पाकिस्तानच्या ग्वादर बंदराशी आपले शहर जोडून चीनने अरबी सागराचा मार्ग मोकळा केला तर आता बांगलादेशच्या माध्यमातून त्याने बंगालच्या उपसागरात जाण्याचा मार्ग तयार करण्याचे ठरविलेले दिसते.

**भारताच्या सीमेलगत :** भारत-बांगलादेश सीमेलगत लालमोईरहट नावाचा हवाईतळ आहे. १९४५ मध्ये संपलेल्या दुसऱ्या महायुद्धापासून तो बंद पडून आहे. त्याच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव चीनने दिला असून, तो बांगलादेशने स्वीकारला आहे. भारतावर दबाव कायम ठेवण्यासाठी चीनने हा निर्णय घेतला असल्याचे मानले जाते. बांगलादेशात सत्ता परिवर्तन झाल्यापासून लगेचच चीनने या हवाई तळाचे नूतनीकरण करण्यास प्राधान्य दिले यावरून चीनसाठी हा प्रकल्प किती महत्त्वाचा आहे याची कल्पना करता येईल.

**तिष्ठा नदी प्रकल्प :** बांगलादेशचे पंतप्रधान तारीक रहेमान यांच्या चीन दौऱ्यानंतर जारी करण्यात आलेले संयुक्त निवेदन तर भारतासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. तिष्ठा नदीचे व्यवस्थापन, नवनिर्माण या साऱ्यासाठी चीन बांगलादेशला संपूर्ण सहकार्य देईल असे त्यात नमूद करण्यात आले आहे. यात कोणत्याही 'तिसऱ्या देशाने' चिंतित होण्याचे कारण नाही. हा प्रकल्प तिसऱ्या देशाच्या प्रभावापासून पूर्णपणे मुक्त असेल असेही चीन-बांगलादेश यांच्या संयुक्त निवेदनात म्हटले आहे.

**'पॉवर चायना' :** तिष्ठा नदी प्रकल्प राबविण्यासाठी चीनने आपल्या 'पॉवर चायना' या कंपनीची निवड केली आहे. पॉवर चायना ही सरकारी कंपनी असून, आशियातील अनेक देशांमध्ये आपले हात-पाय पसरण्यासाठी चीनने या कंपनीचा वापर केला आहे. पॉवर चायना कंपनी चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी- पीएलएचाच एक भाग असल्याचे मानले जाते. यावरून चीनच्या डोक्यात काय काय सुरू आहे याचा अंदाज बांधता येईल.

**अतिशय चिंताजनक :** तिष्ठा नदी भारत-बांगलादेश सीमेजवळून प्रवाहित होते. चीनने या नदीवर डोळा ठेवीत अनेकदा हसीना सरकारकडे नदीच्या विकासाचा प्रस्ताव दिला होता. पण भारताने वेळीच सावध होत, तो प्रत्येक वेळी हाणून पाडला होता. आता तेथे चीनचे समर्थक सरकार आले असल्याने चीनने तिष्ठा नदी विकास प्रकल्पाला हाती घेण्याचे ठरविले आहे. जे भारतासाठी गंभीर चिंता निर्माण करणारे ठरणार आहे. ही नदी भारताच्या सीमेलगत तर आहेच, शिवाय अतिशय संवेदनशील मानल्या जाणाऱ्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'च्या अगदी जवळ आहे. भारत आणि पूर्वोत्तर भारत यांना जोडणाऱ्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'वर चीनची पूर्वीपासून नजर आहे. चीनच्या दबावाखाली हसीना सरकारने तिष्ठा नदी प्रकल्पाच्या तांत्रिक सर्वेक्षणाला मंजुरी दिली होती, पण भारताच्या जोरदार विरोधानंतर ती थंड्या बस्त्यात ठेवण्यात आली होती.

**आणि पाकिस्तानही :** बांगलादेश ज्या पाकिस्तानच्या अत्याचारास कंटाळून वेगळा झाला, विभक्त झाला, त्या पाकिस्तानसोबत त्याने पुन्हा 'प्रेमालाप' सुरू केला आहे. व्यापार-व्यवसाय वाढविण्याचे करार केले जात असताना, त्यात आता एका नव्या कराराची भर पडणार आहे. प्रथमच पाकिस्तान-बांगलादेश 'जॉईंट मिलिटरी कमांड'- संयुक्त लष्करी आघाडी स्थापन करण्याबाबत विचार करीत असून, याबाबत दोन्ही देशांत होत असलेली चर्चा अंतिम टप्प्यात दाखल झाली आहे.

**लढाऊ विमाने :** चीनच्या सहकार्याने पाकिस्तानमधील कराची एरोनॉटिक केंद्रात जेएफ-१७ थंडर या लढाऊ विमानांचे उत्पादन केले जात आहे. मागील वर्षी झालेल्या भारत-पाकिस्तान चकमकीत पाकिस्तानने याच विमानांचा वापर केला होता. पाकिस्तानने आता ही विमाने बांगलादेशला विकण्याचा प्रस्ताव मांडला आहे. पहिल्या टप्प्यात १६ ते ४८ विमाने बांगलादेशला विकली जातील. या विमानांचे प्रशिक्षण बांगलादेशी वैमानिकांना देण्याची प्रक्रिया यापूर्वीच सुरू झाली आहे.

**चीनचा विळखा :** चीन भारताला विळखा घालण्याचे धोरण राबविणार आहे, असे तज्ज्ञांनी यापूर्वीच म्हटले होते. आता ते प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. भारताचा कट्टर शत्रू पाकिस्तानसोबत चीनने यापूर्वीच घट्ट युती केली आहे. भूतान चीनला मांडलिक झालेला आहे. एक काळ होता भारतीय लष्कराची एक ब्रिगेड भूतानच्या रक्षणासाठी तेथे तैनात होती. आता भूतानही भारताच्या विरोधात गेला आहे. नेपाळला चीनने केव्हाच आपल्या विळख्यात घेतले आहे. श्रीलंकेवरही चीनचा प्रभाव वाढत आहे. मालदीवमध्ये तैनात भारतीय सैन्याच्या दोन तुकड्या हटविण्यात चीन होता. तेथे चीनने आपल्या तुकड्या तैनात केल्या आहेत. फक्त बांगलादेश काय तो चीनच्या प्रभावापासून मुक्त होता. आणि दक्षिण आशियात भारताचा एकमेव विश्वासू साथीदार होता, मित्र होता. दुर्दैवाने त्याने भारताचा हात सोडून चीनचा हात धरला आहे. चीनचे 'रेड कार्ड' गळ्यात घालून बांगलादेश आता जगभर मिरविणार असे दिसते. ■

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# भारत बनणार महासत्ता

गेल्या १० ते १२ वर्षांच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात देशाचा दबदबा वाढला असून आज भारताच्या शब्दाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या काळात भारतीय अर्थव्यवस्था खूपच झपाट्याने वाढली आहे. भारताने ४ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्याही पुढे झेप घेतली आहे. १० व्या क्रमांकावरून भारताने तिसऱ्या क्रमांकापर्यंत मजल मारली आहे. गोल्डमन सॅक्सच्या अहवालानुसार आगामी ४० ते ५० वर्षांत भारत ५२ लाख कोटी अमेरिकन डॉलर्सचा टप्पा पार करून दुसऱ्या क्रमांकावर येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, भविष्यात भारताची स्पर्धा प्रामुख्याने चीनसोबत राहील, असा जाणकारांचा अंदाज आहे.

गेल्या काही वर्षांच्या काळात डिजिटल पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. रस्त्यांचे जाळे विणण्यात भारत आज दुसऱ्या क्रमांकावर असून काही अपवाद वगळता जवळपास संपूर्ण भारत डिजिटल झाला आहे. १४७ कोटी लोकसंख्येच्या या देशात झालेली डिजिटल क्रांती पाहून पाश्चात्त्य देशही चकित आहेत. देशभरात राष्ट्रीय महामार्ग आणि एक्सप्रेस वेचे जाळे झपाट्याने विस्तारले आहेत. वंदे भारत आणि अमृत भारतसारख्या हायस्पीड गाड्यांच्या माध्यमातून रेल्वेचा चेहरामोहरा बदलत आहे. गेल्या १० वर्षांत लहान-सहान रेल्वेस्थानकांचा मोठ्या प्रमाणावर कायापालट झाला असून मेट्रो आणि मोनोरेलसारख्या सुविधा नागरिकांना पुरविण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे.

रॉरी पोर्टर नावाचा ब्रिटिश व्लॉगर भारताच्या वंदे भारतमधील सुविधा आणि स्वच्छता पाहून खूपच भारावला. त्याने आपल्या इन्स्टा अकाऊंटवर एक चित्रफीत प्रसारित करून भारत इतका श्रीमंत कधी झाला? असा प्रश्न उपस्थित केला आहे. युनायटेड किंगडममध्ये राहणारे लोक नक्कीच श्रीमंत असतील. कारण, त्यांची लोकसंख्या भारताच्या तुलनेत खूपच कमी आहे. परंतु, बदलत्या भारताची आजची परिस्थिती पाहून हे लोकही आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहात नाही.

आपत्ती काळात भेदभाव न करता भारत मदतीसाठी सदैव तत्पर असतो. कोरोना काळात भारताने अनेक देशांना लसींचा पुरवठा करून मानवतेचे दर्शन घडविले. नेहमी पाकिस्तानची बाजू घेऊन भारताला पाण्यात पाहणाऱ्या तुर्कीलासुद्धा भारताने आपत्ती काळात मोठी मदत केली आहे. अमेरिका-इराण युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्याने भारताचा खनिज तेल पुरवठा खंडित झाला. अशा काळात तब्बल ४० देशांनी भारताला तेल पुरविण्यासाठी पुढाकार घेतला. यातील बहुतांश देशांना यापूर्वी भारताने भरीव मदत केलेली आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, अवकाश संशोधन, शस्त्रास्त्र निर्मिती, अन्नधान्य निर्यात आणि डिजिटल पायाभूत सुविधा यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये भारताने क्रांती केली आहे. भारताची डिजिटल पेमेंट प्रणाली अनेक देश स्वीकारत आहे. भारत जगातील सर्वांत मोठा जेनेरिक औषध पुरवठादार आहे. व्हॅक्सिन हब म्हणून भारताने आपली ओळख निर्माण केली आहे. शेतमाल निर्यातीतही भारत पुढे आहे. अनेक महानगरांमध्ये रात्री प्रवास करताना पाश्चिमात्य देशांत असल्याचा अनुभव येतो. ही सर्व क्रांती केवळ आणि केवळ इच्छाशक्तीच्या बळावर घडून आलेली आहे.

सरकारने कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना आणल्या. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना यासह अन्य अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत आहेत. अल्पभूधारकांसाठी पेन्शनची तरतूद करून लाखो गरीब शेतकऱ्यांच्या वृद्धापकाळाची काळजी घेण्यात आली आहे. राज्य सरकारही शेतकऱ्यांना विपन्नावस्थेतून बाहेर काढण्यासाठी अनेक योजना राबवीत आहे. नुकतीच महाराष्ट्र सरकारने सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करून लाखो शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून जवळपास ३६ हजार ५८५ कोटी रुपये निधीची तरतूद केली जाणार आहे. कुठलेच क्षेत्र विकास प्रवाहापासून वंचित राहू नये म्हणून सरकार प्रयत्नशील आहे. यात नागरिकांनीही आपले योगदान देणे गरजेचे आहे. ■

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# धैर्यवान महिला आणि असंवेदनशील प्रशासन

भारतीय रेल्वे ही देशाची जीवनवाहिनी आहे. दररोज लाखो महिला रेल्वेने प्रवास करतात. रेल्वे प्रशासन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विविध योजना राबवत असल्याचा दावा करत असले, तरी प्रत्यक्षात अनेकदा वेगळे चित्र दिसते. वाराणसी ते नागपूर प्रवासादरम्यान नागपूरच्या एका कुटुंबासोबत घडलेली घटना ही केवळ छेडछाडीची घटना नसून रेल्वे प्रशासन, तिकीट तपासणी व्यवस्था आणि रेल्वे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

या घटनेत सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे ७२ प्रवाशांची क्षमता असलेल्या आरक्षित डब्यात तब्बल ४०० हून अधिक अनधिकृत प्रवासी घुसले. हा केवळ नियमभंग नव्हता, तर सुरक्षिततेचा संपूर्ण बोजवारा होता. आरक्षित डब्यात ज्यांनी तिकीट काढले आहे, त्यांनाच प्रवेश असणे अपेक्षित असताना शेकडो विनातिकीट प्रवासी आत कसे आले? हा प्रश्न प्रत्येक रेल्वे अधिकाऱ्याने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

इतक्या मोठ्या संख्येने अनधिकृत प्रवासी डब्यात शिरल्यानंतर महिलांना उभे राहण्यासाठीही जागा नव्हती. रात्री डब्यातील दिवे बंद झाल्यानंतर काही समाजकंटकांनी महिलांची छेडछाड आणि आपत्तिजनक व्यवहार करून मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. अशा परिस्थितीत महिलांनी रेल्वे हेल्पलाईनवर तक्रार केली; रेल्वेच्या ट्विटरवर सुद्धा तक्रार केली मात्र मदत मिळाली नाही. परिस्थिती इतकी गंभीर झाली की, महिलांनी नैनी रेल्वे स्थानकावर इंजिनसमोर उभे राहून आंदोलन केले. एवढे टोकाचे पाऊल एखादी महिला सहज घेत नाही. जेव्हा व्यवस्था अपयशी ठरते, तेव्हाच नागरिकांना अशा प्रकारचे आंदोलन करावे लागते.

यावेळी रेल्वे पोलिसांनी घेतलेली भूमिका अधिक धक्कादायक होती. ''या चारशे लोकांमध्ये नेमकी छेडछाड कोणी केली ते सांगा,'' असा प्रश्न त्यांनी महिलांना विचारला. ही भूमिका न्याय्य म्हणता येणार नाही. अंधार, प्रचंड गर्दी आणि भीतीच्या वातावरणात नेमका आरोपी ओळखणे शक्य नसते. अशा वेळी पोलिसांनी आरोपींची नावे विचारण्यापेक्षा आरक्षित डब्यातील सर्व अनधिकृत प्रवाशांना तात्काळ खाली उतरवणे, डब्यात सुरक्षा निर्माण करणे आणि महिलांना संरक्षण देणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी होती. येथे रेल्वे पोलिस आणि तिकीट तपासनीस या दोघांचीही जबाबदारी होती. याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे नागपूरला पोहोचल्यानंतर पीडित महिलांनी लोहमार्ग पोलिसांकडे तक्रार केली असता, ''तक्रार उत्तर प्रदेशात जाऊन करा,'' असे सांगण्यात आल्याचा आरोप पीडित महिलांनी केलेला आहे. ही भूमिका अत्यंत खेदजनक आहे. आज देशात 'झीरो एफआयआर' ही संकल्पना अस्तित्वात आहे. तिकीट बुकिंग प्रणालीमध्ये सुद्धा बरेच बदल करण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळेस एखाद्या कुटुंबातील लोक प्रवास करतात त्या वेळेला त्यांनी तिकीट आरक्षित करताना 'कुटुंब' असा जर पर्याय निवडला तर त्यांना सोबत किंवा जवळच्या जागा मिळावयास हव्या. प्रत्येक समस्येवर समाधान शोधून काढणे आवश्यकच असते परंतु त्याचबरोबर समस्या उद्भवणारच नाही हेही बघणे आवश्यक असते. सर्वप्रथम, आरक्षित डब्यात अनधिकृत प्रवाशांचा प्रवेश पूर्णपणे बंद झाला पाहिजे. विना तिकीट कोणालाही रेल्वे स्थानकामध्ये प्रवेश करण्याची अनुमती द्यायला नको. वृद्ध किंवा रुग्णांसाठी रेल्वे विभागाने आपले सेवक ठेवावे. प्रत्येक मोठ्या स्थानकावर आरक्षित डब्यांच्या प्रवेशद्वारावर टीटीई, आरपीएफ आणि रेल्वे कर्मचाऱ्यांची संयुक्त तपासणी असावी. आरक्षित तिकीट किंवा वैध ओळखपत्र नसलेल्या व्यक्तीला डब्यात प्रवेशच मिळू नये.

प्रत्येक स्थानकावर गाडी सुटण्यापूर्वी आरक्षित डब्यांची तपासणी करून अतिरिक्त प्रवाशांना बाहेर काढले पाहिजे. डब्यांमधील प्रवेशासाठी पासवर्ड किंवा क्यूआर कोड स्कॅन करणे असाही पर्याय देता येईल. रात्रीच्या वेळेस आरपीएफचे गस्ती पथक प्रत्येक आरक्षित डब्यात नियमित फिरले पाहिजे. ते खरंच फिरले की नाही यासाठी डब्याच्या सुरुवातीला व शेवटी त्यांचे फेस स्कॅनिंग असले पाहिजे. हेल्पलाईन १३९ वर तक्रार आल्यानंतर पुढील स्थानकावर त्वरित कारवाई करणे बंधनकारक केले पाहिजे. डब्यांमध्ये असे क्यूआर कोड लागलेले असणे आवश्यक आहे जो स्कॅन केल्यास तक्रारदार महिलेचा डब्याचा क्रमांक, आसन क्रमांक ही माहिती संबंधित यंत्रणेला समजेल व आवश्यकता असल्यास पुढील स्थानकावर संबंधित अधिकारी त्याच ठिकाणी जाऊन आरोपीला ताब्यात घेतील. सर्व आरक्षित डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, पॅनिक बटण आणि बॉडी-वॉर्न कॅमेऱ्यांसह गस्ती कर्मचारी उपलब्ध असावेत. रेल्वे पोलिस आणि जीआरपी यांना महिलांशी संबंधित तक्रारी हाताळण्यासाठी विशेष संवेदनशीलता प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पीडित महिलेला आरोपी शोधण्याची जबाबदारी देणे चुकीचे आहे; आरोपी शोधणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ कायद्याचा नाही, तर प्रशासनाच्या इच्छाशक्तीचा आणि कार्यक्षमतेचाही आहे. प्रवाशांनी आरक्षित तिकीट काढूनही सुरक्षित प्रवास मिळत नसेल, तर ती व्यवस्थेची गंभीर अपयशाची कबुली आहे. नागपूरच्या महिलांनी दाखवलेले धैर्य समाजासाठी प्रेरणादायी आहे; परंतु अशी वेळ कोणत्याही महिलेवर येऊ नये, ही जबाबदारी रेल्वे प्रशासन, टीटीई, आरपीएफ, जीआरपी आणि संपूर्ण शासनव्यवस्थेची आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर नेहमीप्रमाणे नुकत्याच झालेल्या पावसामुळे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनधारक मेटाकुटीला आले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांची चाळण झाल्याने छोटे-मोठे अपघात नित्याचे बनले आहेत. आपणाकडे रस्त्यांची खराब देखभाल हे खड्डे पडण्याचे मुख्य कारण बनले आहे. महामार्गावर ज्या ठिकाणी पाऊस पडण्याचे प्रमाण जास्त आहे अशा भागात रस्त्यावर खड्डे, चिखल आणि डबके निर्माण होतात. परिणामी वाहनचालकांना जीव मुठीत धरून वाहने चालवावी लागतात. सध्या सातारा ते कागल दरम्यान रस्त्याच्या सहापदरीचे काम सुरू आहे. यादरम्यान रस्त्यावरील खड्ड्यांकडे महामार्ग प्रशासन आणि ठेकेदार मात्र रस्त्याच्या दुरवस्थेकडे केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी खड्डे बुजवण्याचे काम केल्याचे दिसते. मात्र खड्ड्यात भरलेली डांबराअभावाची खडी उघडी पडल्याने वाहनचालकांना येथून मार्गस्थ होताना मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे वाहने नादुरुस्त होणे, दुचाकी घसरण्याचे, किरकोळ अपघाताचे प्रमाण वाढले आहे. शासनाने मागील दोन तीन वर्षात खड्ड्यांच्या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना आखत असल्याचे दिवा स्वप्न वाहनचालकांना दाखविले आहे. रस्त्याच्या देखभालीसाठी कोटीच्या कोटी उड्डाणे होत असल्याचे शासन दाखवत आहे. मात्र पायाभूत सुविधा सुधारताना कुठेच दिसत नाहीत.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे

■■■

### अशैक्षणिक कामे आणि बेरोजगारी

दि. ९ जुलैला मुंबईच्या आझाद मैदानात शिक्षकांनी राज्यव्यापी शाळा बंद, सामूहिक रजा आंदोलन केले. या शिक्षकांची अशैक्षणिक कामातून मुक्तता करण्याची प्रामुख्याने मागणी होती. ही मागणी फक्त शिक्षकांचीच नव्हे तर राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या पालकांची सुद्धा आहे. मतदारयादी पुनरीक्षण आणि जनगणना या कामात देशातील सरकारी आणि अनुदानित शाळांतील दहा लाखांपेक्षा जास्त कर्मचारी गुंतले आहेत. महाराष्ट्रातील जवळपास पन्नास हजार शिक्षक सुद्धा या कामात कार्यरत आहेत. या कामाचा थेट दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो आहे हे सर्वश्रुत आहे, सर्वांना कळते आहे, अगदी शासनाला आणि अधिकाऱ्यांना सुद्धा. पण त्यावर पर्यायी उपाय शोधण्यापेक्षा शिक्षकांना धमक्या आणि शिक्षेच्या नोटीस पाठवल्या जात आहेत. हे सर्व शासन आणि समाज डोळसपणे बघतो आहे. मान्य आहे की उपरोक्त राष्ट्रीय कार्ये महत्त्वाची आहेत, परंतु त्या बदल्यात विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणे कुठला न्याय आहे? दुसरी बाजू बघितली तर राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या नियत कालिक श्रमशक्ती सर्वेक्षण मे २०२६ च्या अहवालानुसार कोट्यवधी नागरिक सध्या रोजगाराच्या शोधात आहे. देशातील ग्रामीण (५.१ टक्के) आणि शहरी (६.४ टक्के) भागातील बेरोजगारीचा दर वाढलेला आहे. यात ८० टक्क्यांपेक्षा जास्त पदवीधर तरुणांचे प्रमाण आहे. अर्थातच जागतिक अनिश्चितता, सेवा क्षेत्रातील संथ भरती, विकसित तंत्रज्ञानाची गती, कौशल्य आणि शिक्षणातील तफावत वगैरे बेरोजगारीचे काही कारणे आहेत.

राष्ट्रीय कार्ये आणि बेरोजगारी या दोन्ही बाबींचा रास्त विचार करता पात्र बेरोजगार युवकांना प्रशिक्षित करून मतदारयाद्या किंवा जनगणना यासारखे राष्ट्रीय कामे, जबाबदारी निश्चित करून सोपवायला पाहिजे. सेवेत कायम असणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा या युवकांना कामाची आणि मोबदल्याची फार आवश्यकता आहे. शासन त्यांची अनेक कामे खाजगी क्षेत्रामार्फत करवून घेतातच. अग्निवीर, होमगार्ड्स, शिक्षण सेवक, तासिका तत्त्वावरील प्राध्यापक आणि अनेक क्षेत्रांत पात्र बेरोजगार युवक कार्यरत आहेत आणि ते समर्थपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. याद्वारे शासनास नम्र विनंती आहे की अशैक्षणिक कामे पात्र बेरोजगारांना देण्यात यावीत. त्याद्वारे शैक्षणिक नुकसानही टाळता येईल तसेच बेरोजगारांना सुद्धा नियमित भरती होईस्तोवर काही प्रमाणात दिलासा मिळेल.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

### भटक्या श्वानांचा प्रश्नही मार्गी लावावा



तरुण भारतने रस्तोरस्ती अस्ताव्यस्त पडलेल्या बांधकाम साहित्याच्या प्रश्न हाती घेऊन प्रशासनास नियम बदलण्यास व तुरंत कारवाई करण्याकरिता भाग पाडले, याचा आनंद वाटला. तसेच गल्लोगल्ली, चौकाचौकात धुडगूस घालणाऱ्या भटक्या श्वानांचा व तथाकथित पशुप्रेमींचा बंदोबस्त करण्यास प्रशासनाला भाग पाडावे ही समस्त नागपूरकरांची इच्छा आहे. ■

**रवी वाघमारे**/ ९९६००१८०३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

**बीड, दि.13 (जिमाका) :-** राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



**बुधवार दि. 15 जुलै 2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने सकाळी 11 वाजता गेवराई येथे आगमन व शहरातील विविध विकास कामांची आढावा बैठक (स्थळ :** नगर परिषद सभागृह, गेवराई), सकाळी 11.45 वाजता गेवराई येथून पाडळसिंगी ता.गेवराईकडे प्रयाण. दुपारी 12.10 वाजता आगमन व सुपरलक्ष्मी गोल्ड चक्की आटा उद्योगाचा शुभारंभास उपस्थिती. दुपारी 1.30 वाजता पाडळशिंगी येथून बीडकडे प्रयाण. दुपारी 2 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व परळी तिर्थक्षेत्र विकास आणि विविध शासकीय आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी 4 वाजता सह्याद्री फॅमिली रेस्टॉरंटचे उदघाटनास उपस्थिती. सायंकाळी 5 वाजता शासकीय विश्रामगृह, बीडकडे प्रयाण करतील. सायंकाळी 5.20 वाजता बीड, गेवराई व आष्टी मतदार संघाच्या कार्यकर्ते, अभ्यांगताच्या भेटीसाठी राखीव. रात्री 8 वाजतात बीड येथून परळी वैजनाथकडे प्रयाण व रात्री 10 वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.

गुरुवार दि.16 जुलै 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 वाजता परळी, माजलगाव मतदार संघातील अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव (स्थळ - शासकीय विश्रामगृह, परळी वैजनाथ), दुपारी 1.15 वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.

शुक्रवार दि.17 जुलै 2026 सकाळी 11 वाजता यशश्री निवासस्थान येथून वाहनाने अंबाजोगाईकडे प्रयाण. सकाळी 11.30 वाजता आगमन व जस्ट नॅचरल सेंद्रीय कॉप शॉपचे उदघाटनास उपस्थिती (स्थळ - आनंद नगर, अंबाजोगाई), दुपारी 1 ते 3 वाजेपर्यंत केज मतदार संघातील अभ्यांगतासाठी राखीव (स्थळ - जनसंपर्क कार्यालय, अंबाजोगाई), दुपारी 3.30 वाजता वाहनाने परळी वैजनाथकडे प्रयाण, दुपारी 4 वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव. सायंकाळी 5 ते रात्री 8 वाजेपर्यंत परळी शहर व ग्रामीण कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव. शनिवार दि.18 जुलै रोजी सकाळी 7 वाजता निवासस्थान येथून मांजरसुंबा ता .बीडकडे प्रयाण, सकाळी 8.30 वाजता आगमन व भाजपा तालुका संपर्क कार्यालयास भेट देत सकाळी 9 वाजता बीड मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## बीड येथे जिल्हास्तरीय स्पर्धेस 16 जुलैपासून सुरुवात

**बीड, दि.13 (जिमाका) :-** देशातील अत्यंत प्रतिष्ठित आणि सर्वात जुनी राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या जिल्हास्तरीय सामन्यांना दि.16 जुलै 2026 पासून बीडमध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सन 2026-27 या वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धांचा शानदार शुभारंभ होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथील मैदानावर दि. 16 आणि 17 जुलै 2026 या कालावधीत ही जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि. 16 जुलै 2026 रोजी 17 वर्षांखालील मुले आणि मुलींचे सामने, 17 जुलै 2026 रोजी 15 वर्षांखालील मुलांचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. 17 वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म 1 जानेवारी 2010 रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. 15 वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म 1 जानेवारी 2012 रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. तसेच, 15 वर्षांखालील खेळाडूंना एआयएफएफ मान्यताप्राप्त वय निश्चितीबाबतची चाचणी करून घेणे बंधनकारक आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज आणि प्रवेश शुल्क पावती दि. 11 जुलै 2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी सर्व खेळाडू व संघांची www.subrotocup.in या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे. केवळ नोंदणीकृत आणि प्रवेश फी भरलेल्या संघांनाच स्पर्धेत प्रवेश दिला जाईल. जिल्हास्तरीय स्पर्धेत सरस कामगिरी करणाऱ्या संघांची पुढे विभागस्तर आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाईल. राज्यस्तरीय स्पर्धेत विजेत्या ठरणाऱ्या संघाला नवी दिल्ली येथे 'सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी'तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या मुख्य राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

# शेतकऱ्यांवर अन्याय करू नका - बाळराजे पवार



**गेवराई :** गोरगरीब शेतकर्यांवर अन्याय करू नका, त्यांच्या शेत जमीनी गेल्या वर्षीच्या पावसाच्या अस्मानी संकटात खरडून गेल्या, उभी पिके अक्षरश: वाहून गेली आहेत. त्याचा मोबदला त्यांना मिळालाच पाहिजे, एकाही शेतकर्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्या, नसता शेतकर्यांसाठी आंदोलन करावे लागेल, असा इशारा बाळराजे पवार यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकर्यांवर अन्याय होणार नाही, या संदर्भात वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन पुढील निर्णय घेण्याचे आश्वासन उपविभागीय अधिकारी शुभम पवार, तहसीलदार संजय सोनवणे यांनी दिले आहे.

गेवराई तालुक्यातील सिंदफणा आणि गोदावरी नदीच्या काठच्या शेतकर्यांची शेत जमीन गेल्या वर्षी पावसाळी हंगामात, म्हणजेच सप्टेंबर २०२६ च्या वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीने खरडून गेली होती.

या आस्मानी संकटात उभ्या पिकांचा दाणादाण उडाली, जमिनी खरडून गेल्या आणि शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला गेला होता. बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर कृषी विभाग, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून पंचनामे केले होते. हिरापूर, टाकळगाव, कानडा पिंपळगाव आणि एरंडगाव या चारही गावांतील मिळून जवळपास २५० एकर शेतजमीन आणि मोसंबी, आंबा, सीताफळाच्या फळबागा वाहून गेल्या होत्या. मात्र, जेव्हा सरकारी अनुदानाची यादी जाहीर झाली, तेव्हा शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला. २५० एकरचे नुकसान झाले असताना केवळ १० ते १२ शेतकऱ्यांची नावे यादीत आली आणि तीही अवघ्या ५ हजार रुपयांच्या मदतीसाठी, शेतकऱ्यांनी लावलेला आरोप अत्यंत गंभीर असून, या संदर्भात सोमवार ता. 13 रोजी दुपारी एक वाजता भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी वंचित राहीलेल्या शेतकर्यांसह तहसील कार्यालयात जाऊन, उपविभागीय अधिकारी शुभम पवार, तहसीलदार संजय सोनवणे यांची भेट घेऊन शेतकर्यांची बाजू मांडली.यावेळी नप चे माजी सभापती भरत गायकवाड, प्रा. येळापुरे, अशोक चव्हाण, सरपंच घाटूळ काका,सचीन गव्हाणे , जगन्नाथ गव्हाणे, दिनेश निर्मळ, दत्ता ढोरमारे, राजू पटेल, इस्माईल पटेल, गजानन गव्हाणे बाबू गव्हाणे, राहून धापसे , किशोर धापसे, रामप्रसाद गव्हाणे, महेश गव्हाणे,सुनील गिरी यांची उपस्थिती होती.

# हत्या प्रकरण: सात आरोपींवर खुनाचा गुन्हा, पाच आरोपी गजाआड

## आरोपींना आश्रय देणाऱ्यांवर कारवाईसाठी ग्रामस्थांचा पोलीस ठाण्यात ठिय्या

**अंबाजोगाई :** तालुक्यातील घाटनांदूर येथे एका तरुणाची चाकू भोसकून आणि डोक्यात वीट मारून निर्घृण हत्या करण्यात आली. ज्ञानेश्वर उत्तरेश्वर वाकडे (वय २१, रा. पट्टीवडगाव) असे या मृत तरुणाचे नाव आहे. क्षुल्लक वादातून आणि सोशल मीडियावरील वर्चस्वाच्या रागातून ही हत्या झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पाच आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, पळून जाण्याच्या प्रयत्नात एका आरोपीचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. दरम्यान, आरोपींना आश्रय देणाऱ्या मंगल कार्यालय मालक आणि व्यवस्थापकावर मुख्य आरोपी म्हणून गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी संतप्त नातेवाईक आणि ग्रामस्थांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात दिवसभर ठिय्या दिला.

ज्ञानेश्वर वाकडे हा लातूर येथील एका हॉटेलमध्ये कुक म्हणून काम करत होता. तो कामानिमित्त ११ जुलै रोजी आपल्या गावी पट्टीवडगाव येथे आला होता. रात्री साडेसहाच्या सुमारास तो मित्र विवेक तारसे याच्यासोबत पैसे काढण्यासाठी बाहेर पडला. अंबाजोगाईहून काम आटोपून परतत असताना शेपवाडी आणि धायगुडा पिंपळादरम्यान त्यांचा सामना कन्हैय्या ऊर्फ श्रीहरी मिसाळ, विशाल शिंदे आणि सोमनाथ कांबळे यांच्याशी झाला. तिथे सोशल मीडियाच्या कारणावरून सोमनाथ आणि ज्ञानेश्वरचा मित्र प्रथमेश जोगदंड यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. 'मला हलक्यात घेऊ नका' अशी धमकी देऊन ते तिघे निघून गेले.



यानंतर रात्री उशिरा सोमनाथ कांबळे याने प्रथमेशला फोन करून तडजोड करण्यासाठी घाटनांदूर येथील रेल्वे गेटजवळ बोलावले. मात्र, तिथे पोहोचताच आरोपींनी प्रथमेशला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर सात ते आठ जणांच्या जमावाने या तरुणांवर हल्ला चढवला. जीव वाचवण्यासाठी ज्ञानेश्वर अण्णाभाऊ साठे चौकाच्या दिशेने पळाला. मात्र, पाठलाग करून सोमनाथ कांबळे याने ज्ञानेश्वरच्या पोटात चाकू खुपसला. तो खाली पडताच विशाल शिंदे याने त्याच्या डोक्यात वीट मारली, तर गोकुळ इचके याने पाठीवर काठीने वार केले. सुरज ताटे, समाधान मिसाळ, कन्हैय्या मिसाळ आणि गणेश खंदारे यांनीही ज्ञानेश्वरला लाथाबुक्क्यांनी आणि काठ्यांनी बेदम मारहाण केली. या अमानुष मारहाणीत ज्ञानेश्वरचा मृत्यू झाला, तर त्याचे मित्र प्रथमेश आणि विवेक हे गंभीर जखमी झाले.

या प्रकरणी ज्ञानेश्वरचे वडील उत्तरेश्वर वाकडे यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात सोमनाथ केरबा कांबळे (साळुंकवाडी), विशाल शिंदे, गोकुळ इचके, सुरज ताटे, समाधान मिसाळ, कन्हैया सोपान मिसाळ आणि गणेश खंदारे या सात जणांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवत घाटनांदूर येथून पाच आरोपींना अटक केली. यातील एका आरोपीने पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र भिंतीवरून उडी मारताना त्याचा पाय फ्रॅक्चर झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**नातेवाईकांचा पोलीस ठाण्यात ठिय्या आणि तणाव :** ज्ञानेश्वरची हत्या केल्यानंतर आरोपी लपून बसले होते. त्यांना 'आई मंगल कार्यालया'चे मालक तथा घाटनांदुरचे सरपंच महेश गारठे आणि व्यवस्थापक बालाजी मिसाळ यांनी आश्रय दिला असल्याचा आरोप मयताच्या नातेवाईकांनी केला आहे. पोलिसांनी आरोपींना याच मंगल कार्यालयातून ताब्यात घेतले. त्यामुळे आरोपींना आश्रय देणाऱ्या गारठे आणि मिसाळ यांचाही या कटात सहभाग असल्याचा संशय व्यक्त करत, त्यांना या गुन्ह्यात मुख्य आरोपी करावे, या मागणीसाठी ज्ञानेश्वरच्या कुटुंबीयांनी आणि पट्टीवडगावच्या ग्रामस्थांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात दिवसभर ठिय्या आंदोलन केले. घरातील तरुण मुलगा गमावल्याने कुटुंबीयांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. संतप्त जमावामुळे पोलीस ठाण्याच्या आवारात दिवसभर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांमधील असुरक्षिततेची भावना आणि संताप यावेळी स्पष्ट दिसत होता. ॲड. माधव जाधव यांनी आक्रमकपणे आंदोलकांची बाजू मांडली.

**पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांचा सुसंवाद :** ग्रामीण पोलीस ठाण्यात ग्रामस्थांचा जमाव आक्रमक झाल्याने परिस्थिती चिघळण्याची दाट शक्यता निर्माण झाली असताना, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शरद जोगदंड यांनी अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळली. त्यांनी संतप्त आंदोलकांशी थेट संवाद साधला. नातेवाईकांच्या भावना आणि आक्रोश समजून घेत त्यांना शांत करण्याचे काम त्यांनी केले. कायदेशीर प्रक्रियेची योग्य माहिती देऊन आणि दोषींवर कडक कारवाईचे आश्वासन देऊन त्यांनी परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ दिली नाही.

# अंबाजोगाईत शिक्षकाचा संशयास्पद मृत्यू : तथागत चौकात मृतदेह आढळल्याने खळबळ

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील तथागत चौकात सोमवारी पहाटे एका शिक्षकाचा संशयास्पद परिस्थितीत मृतदेह आढळून आल्याने शहरात एकच खळबळ उडाली. विवेक करपे असे मृत शिक्षकाचे नाव असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



पहाटे नागरिकांना तथागत चौकात एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पडलेली दिसल्यानंतर याबाबत शहर पोलिसांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून, शवविच्छेदनासाठी 'स्वाराती' रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

तपासादरम्यान पोलिसांना मृताच्या शर्टाच्या खिशात एका खाजगी बसच्या प्रवासाचे तिकीट आढळून आले आहे. प्राथमिक तपासात हा अपघाती मृत्यू असण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, या घटनेचा सर्व अंगांनी तपास सुरू असून, तथागत चौक व परिसरातील 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांचे फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. घटनास्थळावरील हालचालींचा बारकाईने अभ्यास करून मृत्यूमागील सत्य शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागात भर चौकात संशयास्पद परिस्थितीत मृतदेह आढळल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा तपास अंबाजोगाई शहर पोलीस करत असून, शवविच्छेदन अहवाल आणि 'सीसीटीव्ही' फुटेजच्या आधारे पुढील चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## गेवराई आगारास तात्काळ अत्याधुनिक 'राजमाता 'बस उपलब्ध करून द्या : अनिल बोर्डे

**गेवराई (प्रतिनिधी ) :** जुन्या गाड्या मुळे प्रवाशाची गैरसोय, मध्यवर्ती आगाराला जास्त बसची आवश्यकता. गेवराई प्रतिनिधी:- गेवराई आगारास अत्याधुनिक राजमाता बस उपलब्ध झाली नाही. आगारातील बहुतांश गाड्या जुन्या असून त्या वारंवार नादुरुस्त होत आहेत. त्यामुळे प्रवासी ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय सहन करावी लागत आहे. गेवराई आगार मध्यवर्ती ठिकाण असून येथे रेल्वे नसल्यामुळे बस शिवाय पर्याय नाही. त्यामुळे आगारास अतिरिक्त बसची तातडीने आत्याधुनिक राजमाता बसची अत्यंत आवश्यकता आहे. तरी शासनाने गेवराई आगारास तात्काळ, आत्याधुनिक बस उपलब्ध करून द्यावी अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्र, जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केली आहे.

बोर्डे म्हणाले,, " गेवराई हा तालुका जिल्ह्याच्या मध्यभागी आहे. येथून ग्रामीण भागासह बीड,औरंगाबाद,जालना इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रवासी ये -जा करतात. परंतु आगारातील जुन्या बसेस वारंवार बंद पडत असल्याने विद्यार्थी,नोकरदार,ज्येष्ठ नागरिक, रुग्णाचे हाल होत आहेत".

**1) अत्याधुनिक बस :** प्रवाशाच्या सोयीसाठी व सुरक्षिततेसाठी गेवराई आगारास नवीन राजमाता बस त्वरित द्यावी. 2) बसची संख्या वाढवावी: मध्यवर्ती आगार असल्याने प्रवाशांची संख्या जास्त आहे. त्यामुळे जुन्या गाड्यांच्या बदलीत अतिरिक्त राजमाता उपलब्ध कराव्यात. 3) नियमित देखभाल : वारंवार नादुरुस्त होणाऱ्या गाड्या तात्काळ बंद करण्यात याव्यात. सामान्य नागरिकांना सन्मानाने व सुरक्षित प्रवास मिळणे हा त्याचा अधिकार आहे. त्यामुळे परिवहन विभागाने याची गंभीर दखल घेऊन गेवराई आगाराला प्राधान्याने अत्याधुनिक राजमाता बस तात्काळ उपलब्ध कराव्यात, " असे अनिल बोर्डे यांनी सांगितले आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व विविध सामाजिक उपक्रम राबविण्याबाबत बैठक संपन्न

**परळी वैजनाथ :** महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, समाजोपयोगी अभियान, आरोग्य शिबिर, गरजूंना मदत, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, विविध सामाजिक उपक्रमांच्या आयोजनाबाबत नियोजन बैठक उत्साहात पार पडली.

बैठकीत वाढदिवस साधेपणाने व समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविणे, गरजू नागरिकांना मदत करणे तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम आयोजित करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रत्येक उपक्रमाचे नियोजन, जबाबदाऱ्या आणि नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्याबाबत सूचना मांडल्या. वाढदिवसानिमित्त समाजहिताचे उपक्रम राबवून ना. पंकजाताई मुंडे यांच्या पर्यावरण संवर्धन व सामाजिक कार्याच्या विचारांना अधिक बळ देण्याचा संकल्प सर्वांनी व्यक्त केला.

बैठकीस भाजपच्या ज्येष्ठ नेते डॉ. सौ. शालिनीताई कराड, भाजपा उपाध्यक्ष महादेव इटके, प्रशांत कराड, , वैजनाथ रेकणे, शेख अनिस, नितीन समशेट्टे, जिल्हा कोषाध्यक्ष पवन मोदानी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, नगरसेवक अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, राहुल केंद्रे, ॲड. प्रणव मराठे, वैद्यनाथ बँकेचे संचालक कुलभूषण जैन, महिला आघाडीचे अध्यक्ष श्रीमती सुचिता पोखरकर, अल्पसंख्याक आघाडीचे अध्यक्ष शेख शमी, युवा मोर्चा अध्यक्ष सुशील हरंगुळे, परळी कोषाध्यक्ष अनिश अग्रवाल, ज्ञानोबा सुरवसे, भाजपा ओबीसी अध्यक्ष विजय दहिवाळ आदी उपस्थित होते.

## सेवानिवृत्त एस.टी.कर्मचाऱ्यांच्या बैठकीचे अंबाजोगाई येथे बुधवार, 15 जुलै रोजी आयोजन

**अंबाजोगाई :** एस.टी.सेवानिवृत्त कर्मचारी संघटना, बीड विभागाच्या वतीने अंबाजोगाई येथे बुधवार, दिनांक 15 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता अंबाजोगाई बस स्थानकाचे समोर मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे (पब्लिक क्लब) चे सभागृहात महत्वाची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

या बैठकीस हेमंतराव कुलकर्णी (प्रादेशिक सचिव, मराठवाडा विभाग), शेर जमा खान (अध्यक्ष, बीड विभाग), रमेश महामुनी (सचिव, बीड विभाग) हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकीमध्ये ईपीएस - 2026 सुधारित बदल, सेवानिवृत्तांचे बारामाही मोफत पास, सेवानिवृत्तांचे एनसीएमसी कार्ड, एसटीचे ओळखपत्र, सेवानिवृत्तांचे एप्रिल - 2016 पासूनचे वाढीव वेतन वाढ व घरभाडे भत्ता फरकाबाबत सेवानिवृत्तांचे पेन्शन क्लेम, फॉर्म 10 - डी मंजुरी इत्यादीं बाबत तसेच मिनिमम पेन्शन वाढ व हायर पेन्शन बाबत उपस्थित न्यायालयीन लढाई बाबत सभासदांना माहिती देण्यात येईल. ही बैठक बीड विभागाची असल्याने सदर बैठकीस बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी, धारूर, माजलगाव, अंबाजोगाई व परळी येथील एस.टी.सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी सभासदांनी मोठ्या संख्येने आणि वेळेवर हजर रहावे तसेच इतर सेवानिवृत्त बांधवांना या बैठकीबाबत अवगत करावे असे आवाहन राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेचे बीड विभाग, शाखा अंबाजोगाईचे उपाध्यक्ष परमेश्वर करपे, अंकुशराव दाभाडे, गंगाधरराव नंदीकोले, सोनेराव गजाकोश, अच्युतराव करपे, मुकुंदराव कदम तसेच अंबाजोगाई कार्यकारिणीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व सदस्य यांनी केले आहे.

# जिजामाता उद्यान फूड कॉम्प्लेक्स परिसरात पार्किंगची व्यवस्था करा; राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे निवेदन

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी :** परळी शहरातील जिजामाता उद्यान फूड कॉम्प्लेक्स परिसरात वाढत्या वाहतूक कोंडीचा प्रश्न लक्षात घेऊन स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून द्यावी व वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.




पक्षाचे शहर अध्यक्ष महादेव सोपानराव गंगणे पाटील यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिजामाता उद्यान परिसरात फूड कॉम्प्लेक्स सुरू झाल्यानंतर चारचाकी, दुचाकी व तीनचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढली आहे. मात्र, स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था नसल्याने वाहनधारकांना रस्त्यावरच वाहने उभी करावी लागत आहेत. त्यामुळे परिसरात वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून रुग्णवाहिका, भाविक, नागरिक तसेच इतर वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सदर परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था निर्माण करून वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांची गैरसोय दूर होईल आणि वाहतूक सुरळीत राहील, अशी मागणी निवेदनातून राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष महादेव सोपानराव गंगणे पाटील युवा नेते श्रीनिवास राऊत कार्याध्यक्ष बद्दर भाई उपाध्यक्ष बाबा शेख यांनी या निवेदनातं मागणी केली आहे.

या निवेदनाची दखल घेऊन नगर परिषद प्रशासनाने तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत कंत्राटी नोकरीसाठी अर्ज सादर करावेत

**बीड, दि.13 (जिमाका) :-** जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या वीरपत्नी आणि अवलंबितांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी रोजगाराची उत्तम संधी चालून आली आहे. बीड जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या बीड आणि अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहांमध्ये विविध पदावर तात्पुरत्या, रोजंदारी आणि कंत्राटी स्वरूपात भरती प्रक्रिया राबविली जात आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.20 जुलै 2026 पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

कंत्राटी भरतीमध्ये वसतिगृह अधीक्षक (1 पद), सहाय्यक वसतिगृह अधीक्षक (2 पदे), चौकीदार (2 पदे), महिला स्वयंपाकी (4 पदे), माळी कामगार (1 पद) आणि सफाई कामगार (2 पदे) अशा पदांचा समावेश आहे. या भरती प्रक्रियेत माजी सैनिकांना विशेष प्राधान्य दिले जाणार असले, तरी नागरी उमेदवारांनाही या पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. या भरतीसाठी अर्ज करणारा उमेदवार निर्व्यसनी असणे अत्यंत आवश्यक आहे. यातील चौकीदार हे पद निवासी स्वरूपाचे असल्याने त्यांच्या कामाची वेळ 24 तासांची असेल, तर सहाय्यक वसतिगृह अधीक्षक पदासाठी संगणकाचे ज्ञान आणि टायपिंग अवगत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.20 जुलै 2026 पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करायचे आहेत.

### संकल्प विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव

# स्पर्धा परीक्षेचे महत्त्व ओळखा अन् मुलांना मोबाईल पासून दूर ठेवा : पो.नि. शरद जोगदंड

**अंबाजोगाई :** शहरातील प्रशांतनगर भागात अल्पावधीत नांवारूपाला आलेले संकल्प विद्या मंदिर येथे इयत्ता दहावीच्या व विविध स्पर्धा परीक्षेमध्ये शिष्यवृत्ती प्राप्त, विविध मेडल्स प्राप्त, गुणवत्ता यादीमध्ये झळकलेल्यांसह एकूण २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी आयोजित केला होता.

येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात शनिवार, दिनांक ११ जुलै रोजी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाथ शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप खाडे हे होते. तर यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, युवा वक्ते तथा एक दिवसाचे मुख्यमंत्री म्हणून राहिलेले प्रा.शहाबाज मनियार, सामाजिक कार्यकर्ते भिमसेन लोमटे, शैक्षणिक क्षेत्रातील उत्तम व्यक्तिमत्व गोवर्धन लांब, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, स्पर्धा परीक्षा समन्वयक संतोष राऊत यांची तर विचारमंचावर संस्थाध्यक्ष कैलास चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आर.एस.बडे यांची ही उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांनी प्रतिमा पूजन केले. त्यानंतर शाळेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रारंभी प्रास्ताविक करताना शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आर.एस.बडे यांनी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेच्या वतीने स्कॉलरशिप टॅलेंट सर्च, ज्युनियर आयएएस, एमटीएस (जळगाव) यासह विविध परीक्षेत विद्यार्थी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. असे सांगून वर्षभर संस्था राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी परीक्षेमध्ये नाविन्यपूर्ण यश स्पंदन राजेश्वर स्वामी, विवान स्वप्निल चव्हाण, भूमिका बिजयसिंग भाबरदोडे, श्रुती आदिनाथ मुसळे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले तसेच यावेळी विविध मेडल्स प्राप्त २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी इयत्ता दहावीची पहिली बॅच अतिशय उत्कृष्ट गुण घेऊन अंबाजोगाई मध्ये एक वेगळा ठसा उमटविलाबद्दल त्याही विद्यार्थ्यांचा गुणगौरव याप्रसंगी करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पावसाने दडी मारल्यामुळे कोवळी पिके माना टाकताहेत, शेतकरी चिंताग्रस्त

## जिल्ह्यातील धरणे, नद्या अजूनही कोरडेच, दमदार पावसाची प्रतिक्षा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**

जिल्ह्यात जून महिन्याच्या अखेर पावसाने दमदार हजेरी लावली. शेतकऱ्यांनी लगबगीने खरीप पिकांची पेरणी केली. परंतु त्यानंतर पावसाने दडी मारल्यामुळे आता कोवळी पिके पाण्याअभावी माना टाकत असतांना दिसत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली असून शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला आहे.

हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ, सेनगाव तालुक्यात रिमझिम व तुरळक पावसाने काळ्या आईने हिरवागार शालू परिधान केला. परंतु धरणे, तलाव, नदी, नाल्यांना पाणी नाही. अजूनही ती कोरडीच आहेत. पावसाने अचानक दडी मारल्यामुळे शेतातील पेरणी केल्यानंतर उगवलेली कोवळी पिके आता पाण्याअभावी माना टाकतांना दिसत आहेत. आठवडाभरात पावसाने दमदार हजेरी लावली नाहीतर शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवण्याचे चिन्ह दिसत आहेत. आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांना आता पावसाअभावी चिंता लागली आहे.

उशिरा का होईना पावसाने हजेरी लावली. शेतकऱ्यांनी लगबगीने पेरण्या केल्या. परंतु आता पावसाने दडी मारली असून शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत दिसत आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील पिकांना जीवदान देण्यासाठी आवश्यक असलेला सलग आणि दमदार पाऊस अद्याप झालेला नाही. त्यामुळे पिकांची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली असून,अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकटही डोळ्यासमोर दिसू लागले असून,पाणीसाठे रिकामे असल्याने विहिरी आणि बोअरवेलच्या पाण्याची पातळीही अपेक्षित वाढलेली नाही.जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम असून, सिंचनासाठीही पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे.

ग्रामीण भागातील तलाव आणि लहान-मोठे बंधारे अजूनही कोरडेच असल्याने भविष्यातील पाणीटंचाईची शक्यता अधिक गडद होत आहे. एकीकडे हिरव्या शिवाराने समाधानाचा आभास निर्माण केला असला,तरी वास्तव मात्र वेगळे असून ,खरीप पेरणी झाल्याने काळी आई हिरवी झाली असली तरी नदी, नाल्यांना पाणी नसल्याने तिची ओटी अजूनही कोरडी असून आता शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

# डिझेलअभावी वसमत स्त्री रूग्णालयाची रूग्णवाहीका बंद?

## गर्भवती महिलांची होत आहे गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १३ जुलै**




येथील शासकीय स्त्री रुग्णालयातील रुग्णवाहिका तब्बल तीन महिन्यांपासून डिझेलअभावी बंद असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, यामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिला व इतर महिला रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांना स्वखर्चाने खासगी वाहनांची व्यवस्था करून रुणालय गाठावे लागत असल्याने आरोग्य यंत्रणेच्या कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे.

विशेष म्हणजे, हिंगोली जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक (सीएस) डॉ. नितीन तडस यांनी नुकतीच रुग्णालयाची पाहणी केली, मात्र तीन महिन्यांपासून बंद असलेल्या रुग्णवाहिकेची दखल घेतली गेली नसल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे रुग्णवाहिकेकडे कानाडोळा करण्यामागचे नेमके कारण काय? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ही रुग्णवाहिका केवळ रुग्णांना आणण्यासाठीच नव्हे तर रुग्णालयासाठी आवश्यक औषधे व इतर वैद्यकीय साहित्य आणण्यासाठीही उपयोगी पडत होती. रुग्णवाहिका बंद असल्याने या कामांवरही परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, रुग्णालयात काही आवश्यक औषधांचा तुटवडा असल्याचीही तक्रार समोर येत आहे. त्यामुळे गरीब व ग्रामीण भागातील महिलांना औषधे बाहेरून खरेदी करावी लागत असल्याचा आरोप केला जात आहे. शासनाकडून आरोग्य सेवांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होत असताना, केवळ डिझेलअभावी रुग्णवाहिका तीन महिने बंद राहणे ही गंभीर प्रशासकीय निष्काळजीपणाची बाब नाही का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महिलांच्या आरोग्याशी संबंधित अशा अत्यावश्यक सेवेकडे दुर्लक्ष होत असेल, तर संबंधित अधिकारी व जबाबदार कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून तातडीने रुग्णवाहिका सुरू करावी, तसेच औषधांचा तुटवडा दूर करावा, अशी मागणी नागरिक आणि महिला रुग्णांकडून होत आहे.

# हिंगोलीत वंचीत बहुजन आघाडीचा कार्यकर्ता मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने हिंगोली येथे आयोजित करण्यात आलेला जिल्हा कार्यकर्ता मेळावा आणि नूतन तालुका कार्यकारिणीचा सत्कार कार्यक्रम नुकताच पार पडला. या मेळाव्यात पक्षाची आगामी वाटचाल आणि संघटनात्मक बांधणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष शिवाजी खरात हे होते. तर, प्रमुख मार्गदर्शक हिंगोली जिल्ह्याचे निरीक्षक ज्ञानेश्वर सुलताने आणि जिल्हा निरीक्षक प्रा. सुरेश सिरसाट यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना आणि नूतन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील लोकांपर्यंत कशी पोहोचवावीत, याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाचे कार्यकर्ते रुपेश कदम, सिद्धांत गायकवाड, राहुल भाऊ करवंदे यांनी बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर विश्वास ठेवत त्यांनी पक्षांमध्ये पुन्हा घर वापसी केली.

यावेळी ज्योतिपाल रणवीर (हिंगोली जिल्हा महासचिव), सुनिल खिल्लारे (वसमत व औंढा जिल्हा मुख्य समन्वयक),अशोक कांबळे (समन्वयक) वसमत औढा, सज्जन निर्गुडे समन्वयक वसमत औढा, कैलास भुजंगळे जिल्हा प्रवक्ते, प्रकाश राऊत जिल्हा उपाध्यक्ष . रामेश्वर भालेराव जिल्हा संघटक, विनोद थोरात जिल्हा सचिव, मारुती पंडित जिल्हा सचिव, शेगणी जिल्हा सचिव, रमेश भाई भुजबळ समन्वयक मुकुंद करवंदे समन्वयक माधव सपाटे जिल्हा उपाध्यक्ष, वसमत औंढा, विनोद नाईक हिंगोली तालुकाध्यक्ष, कपिल वाकडे सेनगाव तालुका अध्यक्ष, रंगनाथ स्वामी वसमत तालुका अध्यक्ष, रवी कुमार पंडित कळमनुरी तालुकाध्यक्ष अभय राज भगत तालुका महासचिव औंढा सुरेश कांबळे तालुका महासचिव हिंगोली. शीरत्न खंदारे तालुका महासचिव वसमत, सुनील मुंदडा तालुका महासचिव सेनगाव, प्रकाश भुक्तर तालुका महासचिव सेनगाव, प्रियानंद घोडके तालुका महासचिव कळमनुरी आदी उपस्थित होते. यावेळी नुतन पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात वंचीत बहुजन आघाडीचा कार्यकर्ता मेळावा पार पडला. यावेळी जिल्हाध्यक्ष शिवाजीराव खरात, निरीक्षक ज्ञानेश्वर सुलताने, प्रा सुरेश सिरसाट, प्रवक्ते कैलास भुजंगळे, महासचिव ज्योतीपाल रणवीर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोलीत १५ जुलैला रोजगार मेळावा

हिंगोली- जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि युवाशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि.१५) रोजी हिंगोली येथे भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात महाराष्ट्रातील २० पेक्षा अधिक नामांकित आंतरराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार असून, विविध पदांसाठी २००० पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध आहेत. या मेळाव्यात दहावी, बारावी पास/नापास, आय.टी.आय., डिप्लोमा, इंजिनिअरिंग, सर्व शाखेतील पदवीधर, सीएनसी ऑपरेटर, सिपेट तसेच इतर पात्र उमदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. उमेदवारांसाठी वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे असून, निवड झालेल्या उमेदवारांना साधारणतः १५ ते ३० हजार रुपये मासिक वेतन/विद्यावेतन मिळण्याची संधी आहे. कंपनीमार्फत जेवण, चहा, नाश्ता, बस सुविधा तसेच ८ तास ड्युटी व ओव्हरटाईमची सुविधा लागू राहील. हा रोजगार मेळावा कै. शिवाजीराव देशमुख सभागृह, रामलीला मैदानाच्या बाजूला, हिंगोली येथे दिनांक १५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत होणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन आपल्या करिअरला नवी दिशा द्यावी. इच्छुक उमेदवारांनी उपलब्ध क्यूआर कोड स्कॅन करून त्वरित नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ९७६५५३५४४४, ९६७३६६८८४४ आणि ९६०७९६५६२२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रभाग १७ मध्ये एसआयआर शिबीर



हिंगोली- मतदारांची नाव नोंदणी व पडताळणी संपन्नस्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी आणि मतदार यादीतील नावाची अचूकता राखण्यासाठी, प्रभाग क्रमांक १७ मधील नगरसेवक साद व सज्जाद बिल्डर यांच्या पुढाकाराने प्रभागात नुकताच एक विशेष एस.आय.आर. कॅम्प आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामुळे नागरिकांची मोठी सोय झाली आहे. नागरीकांचे मतदार यादीतून नावे वगळली जाऊ नयेत आणि नवीन मतदारांची नोंदणी व्हावी, यासाठी हा विशेष उपक्रम राबवण्यात आला. यावेली प्रभागातील जवलपास ६०० पेक्षा जास्त महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिरात उपस्थित राहून आपल्या मतदार नोंदणीची व आधार लिंक करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. शिबिरामध्ये नाव नोंदणी, दुरुस्ती आणि पत्ता बदलण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे जमा करून घेण्याची व्यवस्था बीएलओ आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी केली होती.

# आजेगाव जिल्हा परिषद शाळेला शिक्षक देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**

सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथील जिल्हा परिषद शाळेला ४ शिक्षकांची मान्यता होती परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे तसेच शिक्षकांच्या चुकीमुळे येथील एक शिक्षक कमी झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे एका शिक्षकाची नियुक्ती करावी अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड आणि शिक्षणाधिकारी आसावरी काळे यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

आजेगाव येथे १ ली ते चौथीपर्यंत जिल्हा परिषदेची शाळा आहे. या शाळेत १०६ विद्यार्थी-विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. या शाळेत पूर्वी ४ शिक्षकांची संख्या होती परंतु काही तांत्रिक कारणामुळे एक शिक्षक कमी झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. विशेष म्हणजे आजेगाव व परिसरातील विद्यार्थीनी या शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी येतात. शिक्षक कमी असल्यामुळे त्यांच्या अध्ययन व अध्यापनावर परिणाम होत आहे. यासंदर्भात सौ वैशालीताई वाघ यांनी सोमवारी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड आणि शिक्षणाधिकारी आसावरी काळे यांची भेट घेतली. तसेच या शाळेवर शिक्षकाची तत्काळ नियुक्ती करून विद्यार्थीनींचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी मागणी केली आहे.

# बैलजोडी धुण्यास गेलेल्या दोन युवकांचा पाण्यात बुडून मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**

तालुक्यातील घोटा शिवारात कयाधू नदीच्या पात्रात बैलजोडी धुण्यासाठी गेलेल्या दोन युवकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवार दि १२ जुलै रोजी घडली. दोघांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेची नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

घोटा येथील कृष्णा बालाजी व त्याचा मित्र गणेश उर्फ बंटी अर्जून पावडे हे दोघे रविवारी दुपारी बैलजोडी धुण्यासाठी तसेच शेळ्या चारण्यासाठी कयाधू नदीच्या परिसरात गेले होते. दुपारच्या सुमारास कयाधू नदीच्या पात्रात खोल खड्डा असलेल्या भागात भागातील पाण्यात दोघेही उतरले. यावेळी दोघांनाही पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे दोघेही पाण्यात बुडाले. त्यांनी पाण्यावर येण्याचा प्रयत्न केला परंतु खड्ड्यातील गाळात दोघेही फसल्यामुळे ते बुडाले असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

सायंकाळी शेळ्या घरी आल्या मात्र दोन्ही युवक आले नाहीत. त्यामुळे कुटुंबियांनी त्यांचा शोध सुरू केला. यावेळी गावकऱ्यांनी कयाधू नदीच्या पात्रातील खड्ड्यात पाहणी केली असता दोघांचे मृतदेह गाळात फसल्याच्या स्थितीत आढळून आले. गावकऱ्यांनी दोघांचेही मृतदेह बाहेर काढले. यावेळी दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. रात्री उशिरा दोघांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेची नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

# गुठ्ठे बेलोरा येथे आढळली विषारी नागाची चार पिल्ले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**

गुठ्ठे बेलोरा एका घरात सापाचे पिल्लू आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. घरच्यांनी तात्काळ सर्पमित्र पटवेकर महाराज यांच्याशी संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य ओळखून पटवेकर महाराजांनी क्षणाचाही विलंब न लावता सर्पमित्र सोनू शिखरे यांना तातडीने घटनास्थळी पाठवले.

सोनू शिखरे यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता, ते 'इंडियन कोब्रा' (भारतीय नाग) जातीचे पिल्लू असल्याचे स्पष्ट झाले. यावेळी पटवेकर महाराज यांनी परिसरात आणखीही पिल्ले असण्याची शक्यता वर्तवली. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सोनू शिखरे यांनी घराची आणि आजूबाजूच्या परिसराची कसून पाहणी केली. अत्यंत दक्षतेने शोध घेतला असता, एकाच ठिकाणी तब्बल चार बेबी कोब्रा आढळून आले. शिखरे यांनी अत्यंत कौशल्याने आणि सुरक्षितपणे या चारही विषारी नागपुत्रांना पकडले. या मोहिमेमुळे खुशालराव गुठे यांच्या कुटुंबाने आणि ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास सोडला. मानवी वस्तीला असलेला धोका टाळत, पकडलेल्या या चारही पिल्लांना वन विभागाच्या (फॉरेस्ट) अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. सर्पमित्रांच्या या तत्परतेमुळे वन्यजीवांना जीवनदान मिळाले असून, गुठ्ठे बेलोरा परिसरामध्ये त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बॅनरमुळे खटकाळी उड्डाणपूलावरील नामनिर्देशन फलक फाटला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**




येथील खटकाळी उड्डाणपूलावर प्रवाशांच्या सोयीसाठी लावण्यात आलेल्या गावे व अंतर असलेल्या नामनिर्देशन फलकावरच चक्क राजकीय पक्षाच्या जाहीरातीचे बॅनर लावले होते. या बॅनरमुळे हा नामनिर्देशन फलक फाटला असून प्रवाशांना अडचणी निर्माण होत आहेत.

हिंगोली शहरातील गांधी चौक, अग्रसेन चौक, खटकाळी बायपास, इंदिरा चौक, शासकीय विश्रामगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक यासह शासकीय कार्यालयासमोर विविध पक्षांच्या राजकीय पक्षांचे बॅनर मोठ्या प्रमाणात लावले जात आहेत. तसेच विविध कोचींग क्लासेस आणि वाढदिवसांचे मोठमोठे बॅनर लावल्या जात आहेत. या बॅनरमुळे येथील अग्रसेन चौकात बस स्थानकातून येणाऱ्या बसेस तसेच मोठी वाहनांना वाहतुकीच्या कोंडीचा सामना करावा लागत आहे. आता तर राजकीय पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते चक्क प्रवाशांसाठी दिशादर्शक असलेल्या फलकावरही बॅनर लावत असतांना दिसत आहेत. येथील नानाजी देशमुख रेल्वे उड्डाणपूलावरील शासनाच्यावतीने लावण्यात आलेल्या दिशादर्शक फलकावरच बॅनर लावण्यात आल्यामुळे हा फलक फाटल्याचे दिसत आहे. नगर पालिका आणि ग्रामपंचायत याठिकाणी बॅनर लावण्यास परवानगी देते का? असा सवाल नागरिक करीत आहेत.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बाबासाहेब पाटील यांचे हस्ते महावितरणच्या विविध विकासकामांचे लोकार्पण

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १३ जुलै : सौर ऊर्जेच्या माध्यमातून विज निर्मिती करावी व सर्वांनीच सौर उर्जेला प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथे महावितरण कार्यालयामार्फत दहा एमव्हीए ट्रान्सफरचा तसेच जिल्हा वार्षिक योजनेच्या योजनेतून चार कोटी रुपयांच्या महावितरणच्या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता अरविंद बुलबुले हे होते.

यावेळी व्यासपीठावर अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, अहमदपूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष अय्याज शेख, शिवाजीराव देशमुख, तुकाराम पाटील विठ्ठल बोडके, अशोक केंद्रे,अझहर बागवान, अश्विन नागराळे, प्रफुल्ल गुंडरे, मुजीब पटेल, हुसेन मणियार आशिष तोगरे,अमित रेड्डी, युसुफ सय्यद, जावेद बागवान, मुजमील सय्यद, हुसेन मणियार, सद्दाम शेख, किरण बारमाळे, अफरोज शेख, प्रदीप कांबळे, सुधीर गुट्टे सुप्रिया भालेराव,गंगाधर ताडमे महेश हंबीर,राजकुमार शिंदे बाळासाहेब बेडदे, अशोक सोनकांबळे,नरसिंग जगताप, चंद्रकांत गंगथडे, प्रवीण रेड्डी सह विविध मान्यवर उपस्थित होते.



## विविध वृत्त....

### पीक स्पर्धेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देवून गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन कृषि विभागाने केले आहे. कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२६ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफुल या पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आ-हे. खरीप पीक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची मूग व उडीद पिकांसाठी अंतिम मुदत ३१ जुलै पर्यंत आहे.

## खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी घेतली पालकमंत्र्यांची भेट

### लातूर जिल्ह्याच्या तीन महत्त्वाच्या प्रश्नांकडे वेधले लक्ष



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जुलै : लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव बंडप्पा काळगे यांनी शनिवार, दि.११ जुलै २०२६ रोजी उशिरा रात्री लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची लातूर येथील शासकीय विश्राम गृहात भेट घेऊन लातूर जिल्ह्याशी निगडित तीन अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी संबंधित विषयांबाबत स्वतंत्र निवेदने पालकमंत्र्यांना सादर केली.

खा. डॉ. काळगे यांनी लातूर शहरातील वाढती वीज मागणी लक्षात घेता शहरात नवीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची योग्य जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. नवीन उपकेंद्र उभारल्यास लातूर शहरातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच, चालू खरीप हंगामात लातूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकासाठी वापरलेल्या बियाण्यांची उगवण अत्यल्प झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्याने निकृष्ट अथवा बोगस बियाण्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार मदत व नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणीही त्यांनी पालकमंत्र्यांकडे केली.

याचबरोबर, लातूर जिल्ह्यात विविध भागांमध्ये पिकांवर शंखी गोगलगायींचा वाढता प्रादुर्भाव झाल्यामुळे कोवळ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणून देत कृषी विभागामार्फत तातडीने क्षेत्रीय पाहणी, शास्त्रशुद्ध नियंत्रण उपाययोजना, आवश्यक औषधांचा पुरवठा, जनजागृती आणि शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची मागणीही खा. डॉ. काळगे यांनी केली. सदर विषयांची दखल घेत पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

जिल्ह्याच्या विकासाशी आणि शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित या विषयांवर प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा खा. डॉ. काळगे यांनी पालकमंत्र्यांच्या भेटीनंतर व्यक्त केली आहे.

## शंखी गोगल गायीचा प्रादुर्भाव रोखा : माजी आ. धिरज देशमुख



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : लातुरसह मराठवाड्यातील अनेक भागात शंखी गोगलगाय आणि पैसा आळीचा प्रादुर्भाव आतापासूनच दिसून येत असून ते कोवळे सोयाबीन फस्त करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरत आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारकडे केली आहे.

महाराष्ट्रात काही भागात सतत पाऊस पडत असला तरी मराठवाड्याकडे पावसाने पाठ

फिरवली आहे. त्यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहेत. कमी पाऊस असतानाही अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची जोखीम उचलली. लातुरमध्ये आजवर साधारण ३५ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. पावसाअभावी

अनेकांना अद्याप पेरणी करता आली नाही. ज्या भागात पेरणी झाली त्या भागात शंखी गोगलगायीने डोके वर काढले आहे. या संदर्भात शेतकऱ्यांमधून आलेल्या तक्रारींची त्वरित दखल घेऊन माजी आमदार

धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे.

मराठवाड्यातील आमचा बळीराजा आधीच पावसाच्या लहरीपणामुळे आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे प्रचंड चिंतेत आहे. निसर्गाची साथ नसतानाही अनेक शेतकऱ्यांनी पदरचे पैसे लावून, कर्ज काढून पेरणीची मोठी जोखीम उचलली. त्यातच आता या नव्या अस्मानी संकटाने अनेक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आ-

हे. लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात सध्या शंखी गोगलगाय आणि पैसा अळीचा भयंकर प्रादुर्भाव झाला आहे. ते कोवळे सोयाबीन आणि इतर पिके फस्त करत आहे.

## गुणांना सलाम... गरजूंना आधार!

### जंगम समाजाच्या १६८ गुणवंतांचा गौरव; ८७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : लातूर जिल्हा जंगम समाज प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव व स्कॉलरशिप वितरण सोहळा-२०२६ रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दहावी, बारावी, पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी, वैद्यकीय, यूपीएससी, एमपीएससी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या १६८ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच समाजातील ८७ गरजू विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय स्वामी (चाकूर) होते, तर स्वागताध्यक्ष म्हणून इंजि. नागेश अशोक स्वामी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार प्रवीण स्वामी (उमरगा), श्री श्री १०८ काशीनाथ स्वामी शिवाचार्य महाराज (बापू)-पाथरी मठ तसेच धानेश स्वामी (खएड अधिकारी) यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. शिक्षण, स्पर्धा परीक्षा, समाजसेवा आणि उच्च शिक्षणात यशस्वी होण्यासाठी जिद्द, सातत्य, परिश्रम व गुणवत्तेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.

कार्यक्रमास सुभाष (भीमाशंकर) स्वामी देवणीकर, विश्र्वनाथ सावळे, इंजि.सोमनाथ बालकुंदे, षण्मुखानंद मठपती, सूर्यकांत पत्रे, शिवलिंगण्णा मठपती यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभ यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. संजय स्वामी, उपाध्यक्ष इंजि. सुहास स्वामी, सौ. जयश्री दयानंद स्वामी, सचिव मनमथ स्वामी, कोषाध्यक्ष डॉ. सचिन बालकुंदे, स्वागताध्यक्ष -इंजि. नागेश अशोक स्वामी(शासकीय कंत्राटदार)

व्यासपीठ प्रमुख दयानंद कोंकलगे, महिला कार्याध्यक्ष ज्योती स्वामी, युवासंपर्क प्रमुख महेश सुगावे, दीपक मठपती तसेच प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास जंगम समाजातील नागरिक, पालक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या उपक्रमातून ८७ आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, तर १६८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

> महाराष्ट्रात जंगम समाजाचा अभिनव उपक्रम
>
> 'शिक्षणासाठी हातभार' या संकल्पनेला मिळाला समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद महाराष्ट्रात प्रथमच जंगम समाजामध्ये संघटित पद्धतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या योजनेची ✻आर्थिक संकल्पना✻- इंजि. नागेश अशोक स्वामी,(शासकीय कंत्राटदार) इंजि. सुहास स्वामी आणि डॉ. सचिन बालकुंदे यांनी तयार करून शिक्षणासाठी समाजाने पुढाकार घेण्याचा नवा आदर्श निर्माण केला.

शिष्यवृत्तीसाठी पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची निवड सावळे, डॉ. बालकुंदे, निळकंठ(भाऊ) बंडू स्वामी, दयानंद स्वामी (उजेडकर) आणि कार्तिक स्वामी (सलगरा) यांच्या समितीने पारदर्शक पद्धतीने केली. उत्कृष्ट कार्याबद्दल समिती सदस्यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. हा उपक्रम समाजातील शैक्षणिक चळवळीला नवी दिशा देणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पशुधनाचा चारा महागला



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : जुलै महिन्याच्या पहिला फारकता उलटला तरी पावसाने दडी मारलयाने शेतक-यांसह आता पशुपालकांचीही चिंता वाढली आ है. पावसाअभावी पेरण्या रखडल्याने जनावरांच्या चाऱ्याचे नियोजन पूर्णपणे बिघडले आहे. हिरव्या चाऱ्याचे टंचाई निर्माण झाली आहे बजारात चाऱ्याचे दर गगनाला भिडल्याने पशुधन जगवायचे कसे, हा मोठा प्रश्न पशुपालकांसमोर उभा आहे. शहरातील गुळ मार्केट परिसरात कडबा बाजारात शनिवारी मोठया प्रमाणात कडब्याची आवक झाली. मात्र चारा महागल्याने पशुपालकांच्या खिशला ताण बसत आहे

## प्रभाग ५ मध्ये सार्वजनिक सभागृहासाठी जागेची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : खुब्बानगर, शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील गौसपूरा गल्ली नं. १ ते ६, उटगेनगर, श्रीकृष्णनगर, कोल्हेनगर, सिद्धेश्र्वरनगर, मंठाळेनगरमधील नागरिकांसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमासाठी हक्काचे सार्वजनिक सभागृह उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

को-ऑप. ऑईल इंडस्ट्रिजमधील सर्वे नंबर १४२/ब मधील शिल्लक जागेपैकी १८ गुंठे जागा गेल्या अनेक दिवसांपसून पडीक आ-हे. ती जागा सार्वजनिक सभागृहासाठी देण्यात यावी, या मागणीचे निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना शेख अब्दुल्ला रहीम, जय भीमराव ढगे, अशपाक चौधरी, युसुफ बाटलीवाला, इसरार खान पठाण, शामसिंग मंगलसिंग जुनी, अजीम शेख, इब्राहिम शेख, जाकीर शेख, दस्तगीर सय्यद, अकबर शेख, जुनेद शेख, सुमित कांबळे, यशपाल कांबळे, इब्राहिम मनियार, शकील कुरेशी, प्रभाकर गुमटे, सादिक कुरेशी, नितीन चव्हाण यांनी दिले.

## गांधी चौक कचऱ्याच्या विळख्यात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : शहरातील महात्मा गांधी चौकात छोट्या-छोट्या व्यवसायांपासून ते मोठे हॉटेलसचाही व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर आदी ठिकाणाहून दररोज पहाटे खाजगी ट्रॅव्हलस महात्मा गांधी चौकात येऊन थांबतात. मोठ्या प्रमाणात प्रवासी याच चौकात उतरतात. या प्रवाश्यांच्या चहा, नाष्ट्याची सोय व्हावी, म्हणून पहाटे या चौकात चहा, पोहे, इडली, वडा-सांबर विकणारे हातगाडे मोठ्या प्रमाणात थांबतात. प्रवासी चहा, नाष्टा करुन निघून जातात. व्यवसायिकही आपला व्यवसाय करुन निघून जातात. खरकटे, प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, कागदी प्लेटचा कचरा मात्र चौकातच पडून असतो. घंटागाडीवाले हा कचरा उचलत नाहीत. त्यामुळे या चौकात कचराच कचरा पडून आहे.

## एस.आय.आर. अभियानात प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग महत्त्वाचा

### प्रभाग १५ मध्ये बीएलओ व बूथ प्रमुखांची बैठक, जनजागरण रथाचे उद्घाटन




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जुलै : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एस.आय. आर.) अभियानाच्या पार्श्र्वभूमीवर प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक प्रवीण कस्तुरे व पुनीत पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात सर्व बीएलओ, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या महत्त्वपूर्ण अभियानात कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी नियोजनबद्ध जनजागृती करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

बैठकीत एस.आय.आर. अभियानाची उद्दिष्टे, मतदार नोंदणीची प्रक्रिया, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल, नवमतदारांची नोंदणी, मृत व स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे, आवश्यक कागदपत्रे तसेच बूथनिहाय नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक बीएलओ व बूथ प्रमुखाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घराशी संपर्क साधून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाबाबत जागृत करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी एस.आय.आर. अभियानाच्या व्यापक जनजागृतीसाठी सज्ज करण्यात आलेल्या जनजागरण रथाचे उद्घाटन जिल्हा अध्यक्ष .अजित पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा रथ प्रभागातील सर्व भागांमध्ये फिरून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाचे महत्त्व, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देणार आहे. या माध्यमातून प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून मतदार यादी अधिक अचूक व परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

यावेळी नगरसेवक प्रवीण कस्तुरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लोकशाहीची खरी ताकद मतदारामध्ये आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. एस.आय.आर. अभियान हे केवळ प्रशासकीय काम नसून लोकशाही अधिक सक्षम करण्याचे अभियान आहे. प्रत्येक बीएलओ, बूथ प्रमुख आणि कार्यकर्त्याने नागरिकांपर्यंत जाऊन त्यांना या प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

नगरसेवक पुनीत पाटील यांनीही प्रभागातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करून एस.आय. आर. अभियान शंभर टक्के यशस्वी करण्याचे आवाहन केले. प्रत्येक बूथवर प्रभावी जनसंपर्क, घरभेटी आणि जनजागृतीच्या माध्यमातून मतदार नोंदणीचे काम वेगाने पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास नगरसेवक ड. प्रदीप मोरे, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री संजय गिर, मंडळाचे पालक तुकाराम गोरे, मंडळाध्यक्ष रोहित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रभागातील प्रतिष्ठित नागरिक, बीएलओ, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने मतदार उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्वांनी एस.आय.आर. अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचा संकल्प व्यक्त केला. आगामी काळात जनजागरण रथाच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागात व्यापक जनसंपर्क मोहीम राबवून प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार नोंदणी व आवश्यक दुरुस्ती करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## महाडीबीटी पोर्टलवर 'तूर मिनीकिट'साठी अर्ज प्रक्रिया सुरू

### लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१३ जुलै : केंद्र व राज्य शासनाच्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना प्रमाणित तूर मिनीकीटचे (बियाणे संच) वाटप करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यासाठी प्राप्त एकूण ७ हजार मिनीकीटच्या भौतिक लक्षांकापैकी आजतागायत ३ हजार ८३५ मिनीकीटचे वितरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. उर्वरित ३ हजार १६५ तूर मिनीकीटसाठी अद्याप पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे त्यांचे वितरण प्रलंबित राहिले आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी तातडीने ऑनलाइन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत बियाणे संच वितरण करण्याची ही प्रक्रिया पूर्णपणे महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे, लाभार्थ्यांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार आहे आणि यासाठी १० एप्रिल २०२६ पासूनच महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा खुली करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अर्ज करणे सोपे जावे, यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शक टप्पे जाहीर केले असून, इच्छुकांनी सर्वप्रथम ारहरवलीं.ारहरीरीहीीर.र्सेी.ळप/ऋीशी या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन लॉगिन करावे, त्यानंतर 'अर्ज सादर करणे' या पर्यायावर क्लिक करून मुख्य घटकांमधील 'बियाणे वितरण, प्रात्याक्षिक, फ्लेक्झी घटक, औषधे आणि खते' हा पर्याय निवडावा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या उप-घटकांमधून 'बियाणे संच - तूर मिनीकीट' हा पर्याय निवडून आपला अर्ज सादर करावा, जेणेकरून शिल्लक राहिलेल्या बियाणेसंचाचा लाभ घेऊन शेतकऱ्यांना आपले उत्पादन वाढवता येईल.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड बसस्थानकात अल्पवयीन मुलाची हत्या

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ जुलै -**

नांदेड बस स्थानक परीसरात एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आल्याची घटना आज दि. १३ जुलै रोजी पहाटे २.३०च्या सुमारास घडली. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, आरोपीने पोलिसाला घटनास्थळी सोबत आणले होते आणि त्याच्या समोरच हे निघृण हत्याकांड घडले.



सोमवारी पहाटे २:३० वाजताच्या सुमारास सुभाष केळकर, अविनाश ऊर्फ बाटल्या साहेबराव इंगोले (३१) आणि शैलेश ऊर्फ दांड्या यांच्यात जोरदार भांडण झाले होते. या वादानंतर आरोपी अविनाश इंगोले हा बस स्थानकात तैनात असलेल्या नाईट ड्युटी पोलिसाला तक्रार करण्यासाठी किंवा मध्यस्थीसाठी सोबत घेऊन आला. मात्र, पोलिसाच्या उपस्थितीतच आरोपीने रागाच्या भरात सागर सुभाष केळकर (वय १७) याच्या पोटात आणि तोंडावर चाकूने अनेक वार केले.

या भीषण हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सागर केळकरचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ३० वर्षीय अविनाश इंगोले आणि २३ वर्षीय शैलेश या दोन्ही मारेकऱ्यांना ताब्यात घेतले आहे. या बाबत संगीता केळकर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांच्या समोरच एका अल्पवयीन मुलाचा असा निघृण खून झाल्याने परिसरात खळबळ माजली आहे.

# पुण्यस्मरणातून मराठवाडा मुक्ती संग्रामाचा जागर

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १३ जुलै -**

थोर स्वातंत्र्य सेनानी तथा लोकनायक माजी आमदार साहेबराव सखोजीराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुण्यस्मरणातून मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याचा जागर करण्यात आला असून हजारो चहत्यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. बापूंच्या स्मृतिदिनाला उजाळा देत असताना योगदान, समाजसेवेची निष्ठा , लोकहितासाठी केलेले कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश दैदीप्यमान इतिहासातून 'बापू जीवन परिचय' पुस्तकाचे वाटप करण्यात आले आहे.

बारड ग्रामस्थांच्या वतीने नगरीत थोर स्वातंत्र्य सेनानी लोकनायक साहेबराव देशमुख बारडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि.११ जुलै रोजी स्वतंत्र सैनिक स्मारकात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अर्धाकृती पुतळ्याचे पूजन पंचायत समितीचे माजी उपसभापती सुनील देशमुख , एडवोकेट संदीप देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामस्थांच्या वतीने कृतज्ञ पूर्वक सामूहिक मानवंदना देण्यात आली. काँग्रेस कमिटीचे जिल्हा कार्याध्यक्ष तिरुपती कोंडेकर , जिल्हा बँकेचे माजी संचालक गोविंदराव शिंदे नागेलीकर, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास दाड, माजी उपसरपंच बाळासाहेब देशमुख, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजय देशमुख, माजी नगरसेवक कैलास गोडसे, उबाटा शिवसेना जिल्हा उपप्रमुख माणिक लोमटे, भाजपा सल्लागार उत्तमराव लोमटे, माजी सरपंच दिलीप कोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आहे.



मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील योगदान अलौकिक होते. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी लोकनायक म्हणून घेतलेली भूमिका सर्वांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे. नव्या पिढीने केवळ बापूंचे स्मरण न करता त्यागाचा, निष्ठेचा, लोकसेवेच्या मार्गावर चालण्याचा यावेळी निर्धार केला. यावेळी एकनाथ शिंदे दही कळमकर लिखित 'बापू जीवन परिचय' पुस्तकाचे ग्रामस्थांना वाटप करण्यात आले. या पुस्तकात बापूंच्या जीवनातील खडतर संघर्ष , स्वातंत्र्य चळवळीतील सक्रिय सहभाग, २५ वर्ष आमदार म्हणून केलेली लोक हिताची कार्य, सामाजिक बांधिलकी यांचा वेध घेण्यात आला आहे. पुस्तक केवळ एक व्यक्तीचा इतिहास नसून संपूर्ण कालखंडाचा , त्यागाचा दस्तऐवज ठरणारा आहे. यावेळी विश्वनाथ पवार निवघेकर, सरपंच ज्ञानेश्वर गावंडेवाड, महेश देशमुख, प्रा.संदीप देशमुख,गणपत शिंदे नागेलीकर, राजेश पवार, श्रीनिवास महाद्वाड, किशोर देशमुख, के. डी. देशमुख, गजानन देशमुख, बाळासाहेब आंबेगावकर, नामदेव बिचेवार, नागोराव भांगे, बालाजी शिंदे, दिगंबर टिपर्से, नारायणराव देशमुख, मोहम्मद गौस, सुरेश गोवंदे, गणेश राव सूर्यतळे, आनंदा पवार, अमोल लोमटे, किशोर पिल्लेवाड, भगवान पवार निवघेकर, शरद कवळे, गजानन कत्रे,सुनील देशमुख, संदीप देशमुख यांच्यासह कुटुंबातील सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

## मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण अंतर्गत गणना फॉर्म संकलनसाठी कॅम्प

**नांदेड** -भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (डशिलळरश्र खपींशपीळींश ठशींळीळेप - डखठ) कार्यक्रमांतर्गत ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत, सर्वसमावेशक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार म्हणून नोंद सुनिश्चित करणे, मृत, स्थलांतरित किंवा दुबार नोंदी अद्ययावत करणे तसेच प्रत्येक मतदाराची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून मतदार यादीची विश्वासार्हता अधिक बळकट करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी संजय वारकड तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी श्री. सानप (उपअभियंता, पाटबंधारे विभाग) यांनी गुजराती हायस्कूल, नांदेड येथे ११ बीएलओंच्या कार्यक्षेत्रातील मतदारांसाठी विशेष कॅम्पची पाहणी केली. कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बीएलओंनी मतदारांकडून गणना फॉर्म भरून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आणि त्याचवेळी माहितीचे डिजिटायझेशन करण्याची प्रक्रिया प्रभावीपणे राबविली. यामुळे मतदार नोंदणीची प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि अचूक होत असल्याचे यावेळी निदर्शनास आले. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी उपस्थित सर्व बीएलओंना मार्गदर्शन करताना गणना फॉर्मचे शंभर टक्के वाटप, त्वरित संकलन आणि त्याच दिवशी डिजिटायझेशन करण्याच्या सूचना दिल्या. फॉर्म संकलन आणि डिजिटायझेशन यामध्ये कोणताही फरक राहता कामा नये. दोन्ही कामे समांतर आणि शंभर टक्के पूर्ण करावीत, अशा सक्त सूचना त्यांनी दिल्या. सुपरवायझर सापटगावकर यांनी कॅम्पमध्ये उपस्थित राहून बीएलओंच्या अडचणी जाणून घेतल्या आणि त्यांचे तत्काळ निराकरण केले. भारत निवडणूक आयोगाचे ध्येय कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये आणि कोणतीही अपात्र नोंद मतदार यादीत राहू नये हे आहे. त्याच अनुषंगाने कार्यक्रमाद्वारे घराघरात जाऊन पडताळणी, अचूक माहिती संकलन, तात्काळ डिजिटायझेशन आणि पारदर्शक मतदार नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यामुळे भविष्यातील निवडणुकांसाठी अधिक विश्वासार्ह, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त मतदार यादी तयार होण्यास मोठी मदत होणार आहे. प्रशासनाने सर्व पात्र नागरिकांना या विशेष मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आवश्यक माहिती व कागदपत्रे बीएलओंकडे वेळेत उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले आहे.

## आमदार डॉ.तुषार राठोड यांच्या हस्ते एसआरपीएफ अल्ताफ शेख चा गौरव

**आदमपूर**-मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा येथील अल्ताफ एकबाल शेख या तरूणाची नुकतीच राज्य राखीव पोलीस बल जालना येथे 'सशस्त्र पोलीस शिपाई' म्हणून निवड झाल्याबद्दल त्याचा मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघांचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय कार्यसम्राट विद्यमान आमदार डॉ.तुषार राठोड व मान्यवरांच्या हस्ते शाल,पुष्पहार देत भव्यदिव्य नागरी सत्कार करण्यात आला.तद्नंतर चांडोळा ग्रामस्थांच्या वतीने आमदार डॉ.तुषार राठोड यांचाही आगमनाबद्दल यथोचित मंडपी सन्मान झाला. यावेळी कार्यक्रमास भाजपा विधान सभा प्रमुख खुशालराव पाटील, माजी सभापती लक्ष्मणराव पाटील, भाजपा मंडळ अध्यक्ष व्यंकटराव पाटील वसूरकर,खरब खंडगांव सरपंच व पोलीस पाटील डॉ.रणजित काळे,भाजपा मंडळ संचालक हाणमंत नरोटे,चांडोळा बँक सहाय्यक महमदरफी मदार, माजी अध्यक्ष बालाजी पाटील, माजी जि.प.सदस्य संतोष बोनलेवाड,भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस शिवा आलेवार बेळीकर,संचालक दत्ता पाटील, पं.समिती माजी सदस्य शिवलिंग नाईक,किरण पाटील बोडके, नगरसेवक प्रतिनिधी संजय तमशेट्टे, शौकत होनवडजकर,स्वीय सहाय्यक सुधीर चव्हाण, चेअरमन बळवंत पाटील, चांडोळा सरपंच रावसाहेब रावसाहेब काळगे,माजी सरपंच साहेबराव वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते गुंडेराव गायकवाड, राजू पाटील,गणेश महाराज, बाळू नाईक,वडील एकबाल शेख, मोहिद्दीन शेख व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.



खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे स्वीय सहाय्यक विनोद हामणे यांनी हिंगोली जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. श्रेणिक लोढा यांची सदिच्छा भेट घेतली.

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी माऊली मित्र मंडळ सज्ज

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ जुलै -**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी जाणार्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी माऊली मित्र मंडळ, नांदेड यांच्या वतीने सातारा जिल्ह्यातील काळज (ता. फलटण) येथे १५, १६ आणि १७ जुलै दरम्यान मोफत सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवा हीच ईश्वरभक्ती'या भावनेतून वारकर्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

शिबिरामध्ये वारकऱ्यांसाठी सकाळी नाश्ता व चहा, लहान मुलांसाठी व वारकऱ्यांसाठी दुधाची व्यवस्था, शुद्ध व सात्त्विक महाप्रसाद, तसेच मोफत आरोग्य तपासणी व प्रथमोपचार सुविधा उपलब्ध असतील. आपत्कालीन परिस्थितीसाठी २४ तास रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात येणार आहे. सलग पायी चालल्यामुळे होणारा शारीरिक थकवा दूर करण्यासाठी सेवाभावी कार्यकर्त्यांकडून अभ्यंग सेवा (फूट मसाज) देण्यात येणार असून, वारकर्यांना आराम मिळावा हा या उपक्रमामागील उद्देश आहे.



वारी ही परंपरा नाही तर आमचा श्वास आहे, हा संदेश देत माऊली मित्र मंडळाने सर्व वारकरी बांधवांना या सेवा शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सेवाभावातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, वारकर्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याची भावना मंडळाच्या पदाधिकार्यांनी व्यक्त केली.

# बिलोलीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नियोजित पुतळा उभारणीच्या जागेची पाहणी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १३ जुलै -**

लोकशाहीर तथा साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या नियोजित पुतळ्याच्या उभारणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेची बिलोली शहरात प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी पुतळा उभारणीसाठी आवश्यक सुविधा, जागेची उपलब्धता, परिसराचे सुशोभीकरण तसेच भविष्यातील विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पाहणीदरम्यान पुतळा उभारणीचे काम नियोजनबद्ध व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याबाबत संतोष कुलकर्णी यांनी सूचना मांडल्या. अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करणारे हे स्मारक शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक वैभवात भर घालणारे ठरेल, असा विश्वास नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

यावेळी बिलोली नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष भीमराव जेठे, नगरसेवक उमेश(भाऊ) बिलोलीकर नगरसेवक राजू कुडके, नगरसेवक संदीप कटारे, नगरसेवक शिवाजी गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते मुकिंदर कुडके, नगरसेवक प्रतिनिधी महेंद्र गायकवाड, मार्तंड जेठे, संग्राम जेठे, मार्केट कमिटी संचालक बाबू कुडके, बाळासाहेब लाखे, हणमंत कुडके, चंद्रकांत आंबेकर, मधुकर कुडके, गंगाधर कुडके तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुद्वारा बोर्डाकडून कंत्राटदार कंपनीला ताकीद; मशनरी आणि कागदपत्रे सादर करण्याचे आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ जुलै -**

येथील प्रसिद्ध तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब गुरुद्वारा बोर्डाने हाऊसकीपिंग आणि व्यवस्थापनाचे कंत्राट घेतलेल्या मेसर्स के.झेड. सिक्युरिटास प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला कडक शब्दांत ताकीद दिली आहे. काम सुरू होऊनही निविदेतील अटींनुसार आवश्यक मशनरी आणि कागदपत्रे वेळेत जमा न केल्यामुळे बोर्डाचे अधीक्षक यांनी हे कारणे दाखवा वजा कडक अंमलबजावणीचे पत्र जारी केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर कंपनीला १ मे २०२६ पासून गुरुद्वारा परिसर आणि परिसरातील हाऊसकीपिंग, फॅसिलिटी मॅनेजमेंट आणि मेंटेनन्स सेवांचे कंत्राट देण्यात आले आहे. सेवा सुरू झाल्या असल्या तरीही निविदेत नमूद केलेली आवश्यक यंत्रसामग्री आणि उपकरणे अद्याप प्रत्यक्ष जागेवर तैनात करण्यात आलेली नाहीत, ही गंभीर बाब गुरुद्वारा प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे.

**तीन दिवसांची अंतिम मुदत; अन्यथा दंडात्मक कारवाई**

गुरुद्वारा बोर्डाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत कंपनीला हे पत्र मिळाल्यापासून ०३ (तीन) दिवसांच्या आत खालील बाबींची पूर्तता करण्याचे आदेश दिले आहेतपरफॉर्मन्स बँक गॅरंटी वार्षिक कंत्राट मूल्याच्या ५% इतकी सुरक्षा रक्कम जमा करणे बंधनकारक आहे.

कंत्राटांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नावे, पदनाम, ईपीएफ योगदान तपशील, नवीन ईपीएफ चालान आणि ईसीआरसह ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे.यंत्रसामग्रीची यादी व छायाचित्रे: प्रत्यक्ष जागेवर तैनात असलेल्या सर्व हाऊसकीपिंग मशनरी, उपकरणे, साधने आणि साहित्याची छायाचित्रांसह संपूर्ण यादी जोडणे.

**प्रशासनाचा इशारा**

निविदेतील अटींचे त्वरित आणि काटेकोर पालन न केल्यास कंत्राटदार कंपनीवर दंडात्मक कारवाई केली जाईल, तसेच निविदेतील नियमांनुसार पुढील कडक पावले उचलली जातील. या पत्राला 'अत्यंत तातडीचे' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

# स्वारातीम विद्यापीठात डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आज व्याख्यान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ जुलै -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील 'डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्रा'च्या वतीने डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त एका 'विशेष व्याख्यानाचे' आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान येत्या १४ जुलै २०२६ (मंगळवार) रोजी

सकाळी ११:०० ते दुपारी १२:३० दरम्यान आयोजित करण्यात आले असून, या कार्यक्रमात 'मराठवाडा : काल, आज व उद्या' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली आहे.

विद्यापीठाच्याअधिसभा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. मनोहर चासकर हे भूषवणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून सिंचन प्रकल्पग्रस्त पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष मा. माधव भंडारी (पुणे) (कॅबिनेट मंत्री दर्जा, महाराष्ट्र राज्य) उपस्थित राहणार असून, ते विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या निमित्ताने डॉ. शंकरराव चव्हाण यांचा विकासविषयक दृष्टिकोन आणि मराठवाड्यापुढील आजची आव्हाने यांवर चर्चा होणार आहे.

या विशेष व्याख्यानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक प्रा. दिलीप चव्हाण यांनी केले आहे.

# एकदिवसीय सत्य अन्वेषण शिबिराचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ जुलै -**

तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आज १४ जुलै रोजी श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात एकदिवसीय सत्य अन्वेषण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात ध्यान साधना, शील संवर्धन आणि सदाचार, सत्य शोध प्रशिक्षण कार्यक्रम होणार असून नागपूर येथील जागतिक कीर्तीचे विपश्यनाचार्य पूज्य भदंत विनयरक्खित महाथेरो यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी खुरगाव नांदुसा येथील भिख्खू संघ आणि हिंगोली बीड येथील पुज्य भिक्खू धम्मशील थेरो यांची उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती मुख्य संयोजक तथा अखिल भारतीय भिख्खू संघाचे जिल्हाध्यक्ष संघनायक धम्मगुरु भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली.

धावपळीच्या आणि ताणतणावाच्या आजच्या युगात मनाला खरी शांतता, स्थिरता आणि जीवनाचा खरा आनंद मिळवून देणारा सुवर्णयोग म्हणजे आजचा हा कार्यक्रम आहे. आपण कोण आहोत आणि जीवनाचे अंतिम सत्य काय आहे, याचा सखोल शोध घेण्यासाठी आज दि. १४ जुलै रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सत्य अन्वेषण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरपूर्व नावनोंदणी आवश्यक असून शुभ्र वस्त्र परिधान करून आणि स्वतः साठी एक डायरी व पेन घेऊन दिवसभर थांबण्याच्या तयारीने यावे. सर्वांसाठी चहा नाश्त्याची सोय करण्यात आली आहे. २० आणि त्यापुढील वयोगटातील महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने शिबिरात उपस्थित राहण्याचे आवाहन भदंत पंय्याबोधी थेरो यांनी केले आहे.

# गोकुंदा रेल्वे उड्डाणपूल रखडल्याप्रकरणी आमदार भीमराव केराम आक्रमक

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १३ जुलै -**

गोकुंदा येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ (अ) वरील रेल्वे उड्डाणपूलाचे काम गेल्या आठ वर्षांपासून रखडल्याने आदिवासी व पेसा क्षेत्रातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणी आमदार भीमराव केराम यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.



निवेदनात रेल्वे मंत्रालय, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन उड्डाणपूलाचे काम निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, प्रत्यक्ष पाहणी करून विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गोकुंदा रेल्वे फाटकावर दिवसातून अनेक वेळा रेल्वे वाहतुकीमुळे वाहतूक कोंडी होत असून शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी तसेच माहूर व पोहरादेवीकडे जाणाऱ्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आदिवासी भागातील नागरिकांना सुरक्षित दळणवळणाचा घटनात्मक अधिकार मिळावा यासाठी आयोगाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी आमदार केराम यांनी केली आहे.

# उद्घाटनापूर्वीच नव्या शासकीय इमारतीला तडे

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १३ जुलै -**

इस्लापूर ग्रामपंचायतीच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या मंडळ अधिकारी कार्यालयाच्या नव्या इमारतीचे काम पूर्ण होण्यापूर्वीच भिंतींवर तडे दिसू लागल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उद्घाटनापूर्वीच भिंतींना तडे जाणे आणि त्या भेगा रंग व पुट्टीने झाकण्यात आल्याचे समोर आल्याने काम निकृष्ट दर्जाचे असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे.



लाखो रुपयांच्या शासकीय निधीतून उभारण्यात येणाऱ्या या इमारतीत काम पूर्ण होण्यापूर्वीच तडे पडणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. त्यामुळे बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले का, तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आले का आणि कामावर योग्य देखरेख ठेवण्यात आली का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

संबंधित विभागाने स्वतंत्र तज्ज्ञांकडून इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी. चौकशीत काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे आढळल्यास संबंधित ठेकेदार, तांत्रिक अधिकारी आणि जबाबदार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच दोषपूर्ण बांधकामाची दुरुस्ती करूनच इमारत वापरासाठी खुली करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

सार्वजनिक पैशातून उभारल्या जाणाऱ्या शासकीय इमारतींच्या दर्जाशी तडजोड होणे हे गंभीर प्रकरण असून, या संपूर्ण कामाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी इस्लापूर परिसरातून होत आहे.